येणे प्रमाणे चतुःसिमेतील वर्णनाची जमीन ही सुधीर दत्तात्रय ताकभाते, सुनिता सचिन कोंढारे, मनीषा दत्तात्रय ताकभाते, दत्तात्रय विश्वनाथ ताकभाते, उषा सुभाष ताकभाते, पद्मिन वसुदेव गोडगे, योगिता भागवत सांगोलकर, रा. दारफळ, ता. माढा, जि. सोलापूर, यांना रेमुनं. ४०/२०१० मधील तडजोड हुकूमनाम्यानुसार आलेली आहे. त्यांनी सदर जमीन ही आमच्या अशिलास त्यांच्या कायदेशीर कौटुंबीक गरजेपोटी विक्री करण्याचे ठरवून त्यांच्याकडून इसार रक्कम स्विकारलेली आहे आमचे अशिलासोबत तोंडी व्यवहार झालेला आहे. त्यांच्यामध्ये खरेदी-विक्रीचा व्यवहार करण्याचा ठरलेला आहे. सदर जमीन सुधीर दत्तात्रय ताकभाते, सुनिता सचिन कोंढारे, मनीषा दत्तात्रय ताकभाते, दत्तात्रय विश्वनाथ ताकभाते, उषा सुभाष ताकभाते, पद्मिन वसुदेव गोडगे, योगिता भागवत सांगोलकर यांनी निर्वेध निजोखमी बिनबोजाची खरेदी देण्याची जमीन मालकानी आमच्या अशिलास दिलेली आहे. तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचा हक्क अधिकार, हितसंबध असल्यास सदर जमिनीसंदर्भात कोणी साठेखत, गहाणखत, नजरगहाण, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बक्षिस पत्र, बोजा, वाटणीपत्र, मृत्युपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा, हक्क, हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर लेखी कळवावी मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा नोंदणीकृत व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीखतावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीखतापुर्वी पूर्व जाहीर सावधानतेची नोटीस दिली असे. ता. १७/१२/२०२५

सही/-
**अशिलातर्फेड.**
**ॲड. घोळवे आर. एन.**
**बी.ए., एल.एल.बी.**
**ENR. No. MH/4580/2006 Adv. CODE.1542**
**रा. अलिपूर रोड, शंकर पार्वती नगर, बार्शी**
**मो.नं. ७५८८२१५२५९ / ९९२२०१९९१८**



**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

सोलापूरातील तमाम लोकांना, विशेषतः मौजे दहिटणे तालुका अक्कलकोट जि. सोलापूर हद्दीतील व या परिसरातील सर्व रहिवांशाना आणि वित्तीय संस्थाना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : डि व सब डी उत्तर सोलापूर पैकी मौजे दहिटणे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं.२९६/३, एकूण क्षेत्र ९.हे. ८८.००आर. आकार रु. १४.१९ पैसे असे आहे यांसी चतुःसिमा पुढीलप्रमाणे :- पुर्वेस - गट नं. २९२, पश्चिमेस गट नं. ३७४/१, दक्षिणेस गट नं. २९७, उत्तरेस - गट नं. २९५. येणेप्रमाणे शेतजमीनचे मालक शावेझ सुजातअली शेख व इतर हे असून त्यांचे वैयक्तिक कारणास्तव आमचे अशिल श्री. माणिक मोतीराम चव्हाण यांना कायमखुश खरेदी देण्याचे ठरवून इसारा दाखल काही रक्कम स्विकारल्या आहेत.

सबब वर नमूद शेतजमीनी विषयी कोणाचा वाद, वहिवाट, करार, मॉर्गेज, इसारा, कर्ज, पावती, अगर इतर कुठल्याही प्रकारचे हितसंबंध वर नमूद शेतजमीनी विषयी असल्यास त्यांनी खालील नमूद वकीलाकडे योग्य त्या कागदपत्रानिशी १५ (पंधरा) दिवसांच्या आत समक्ष भेटून लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर वर नमूद शेतजमीन निर्वेध व निजोखमी आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची सबंधितानी नोंद घ्यावी. ही जाहिर नोटीस दिली दिनांकः १८/१२/२०२५

सही/-
**सय्यद अ. जलीदहुसेन**
**ॲडव्होकेट नोटरी**
**बी.कॉम., एल.एल.बी, रा-१३५, रेल्वे लाईन,**
**सोलापूर ४१३००१ मो.९८२३१५१९१५**


## निधन वार्ता...

### जिजाबाई कोळी

**मंगळवेढा, दि. १७ डिसेंबर-**

तालुक्यातील चिक्कलगी येथील जिजाबाई मारुती कोळी यांचे मंगळवार दिनांक १६ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजणेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८६ वर्षेच्या होत्या. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. श्री संत दामाजी कामगार पतसंस्थेचे सचिव राजकुमार कोळी यांच्या त्या मातोश्री होत.



### रेखा स्वामी

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

संतोष नगर, जुळे सोलापूर येथील रहिवासी व विद्यानिकेतन प्रशालेतील माजी सहशिक्षिका रेखा बसवराज स्वामी (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा प्रसिद्ध भूलतज्ञ डॉ. राहुल, सून डॉ. स्मिता व नातवंडे असा परिवार आहे.



# महसूल कर्मचारी उद्यापासून बेमुदत संप पुकारणार!

**विनाचौकशी निलंबनाच्या कारवाईवर संघटना आक्रमक**

**दुसऱ्या दिवशीही १२९७ कर्मचारी सामुहिक रजेवर**

**महसूलमंत्र्यांनी बोलावली गुरूवारी तातडीची बैठक**





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

तहसीलदारांच्या विनाचौकशी होणाऱ्या निलंबनाच्या घोषणांमुळे तसेच महसूल विभागाच्या दीर्घकाळ प्रलंबित आर्थिक व सेवाविषयक मागण्यांचा निपटारा न झाल्याने महसूल कर्मचाऱ्यांचे मंगळवारपासून राज्यभरात तीव्र आंदोलन चालू आहे. दरम्यान, याबाबत महसूल मंत्र्यांबरोबर गुरूवार, दि. १८ रोजी दुपारी संघटना पदाधिकाऱ्यांची एक बैठक असून, या बैठकीत मागण्या मान्य न झाल्यास महसूल कर्मचारी शुक्रवारपासून बेमुदत संप पुकारणार असल्याचा इशारा महाराष्ट्र राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी समन्वय महासंघाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे. दरम्यान, जिल्ह्यातील १२९७ कर्मचारी आज दुसऱ्या दिवशीही सामुहिक रजेवर गेल्याने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय व इतर सर्व महसूल विभागात शुकशुकाट दिसून आला.

नागपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या विधीमंडळाच्या अधिवेशनात महसूल मंत्र्यांनी अवैध गौण उपसा प्रकरणी ४ तहसीलदार, ४ मंडळ अधिकारी आणि २ तलाठ्यांना दोषी धरुन थेट निलंबित केले आहे. मात्र या प्रकरणाची चौकशी करुन कारवाई होणे अपेक्षित होते. त्यामुळे निलंबनाची झालेली कारवाई चुकीची आणि कर्मचाऱ्यांचे मनोधर्य खच्चीकरण करणारी आहे. यासाठी पुणे विभागातील विविध जिल्ह्यात महसूल कर्मचारी, तलाठी कर्मचारी आणि तहसीलदार, नायब तहसीलदार संघटनेच्या वतीने सामूहिक आंदोलन सुरु करण्यात आले आहे. मंगळवारी जिल्ह्यातील जवळपास दीड हजार कर्मचारी सामुहिक रजा आंदोलनात सहभागी झाले होते. आजही हे कर्मचारी कर्तव्यावर हजर नाहीत. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात दुसऱ्या दिवशीही कोरोना काळाप्रमाणे आजही दिवसभर शुकशुकाट दिसून आला.

कुठलीही तक्रार झाली तर चौकशी न करताच महसूल मंत्र्यांकडून थेट विधिमंडळातच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निलंबनाच्या घोषणा केल्या जातात. अधिकारी-कर्मचाऱ्यांची बाजू ऐकून घेतली जात नसल्याने त्यांच्यामध्ये भीती व तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. नैसर्गिक न्यायाने कारवाई व्हावी, अशी अपेक्षा या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे. याबाबत गुरूवारच्या बैठकीत महसूल संघटना आणि महसूल कर्मचारी संघटना यांच्यात काही निर्णय न झाल्यास हे कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा देण्यात आला. या संपामुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे मात्र प्रलंबित पडणार असल्याचे दिसून येत आहे. आज संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये गट अ ३३, गट ब ४५, गट क ११२४, गट ड ९५ असे एकूण १ हजार २९७ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. तर कर्तव्यावर गट अ १, गट क ५, गट ड ४ असे एकूण १० कर्मचारी होते.

### निलंबन आदेश मागे घेण्याची मागणी

१२ डिसेंबर २०२५ रोजी विधानसभेत कोणतीही चौकशी न करता ४ तहसीलदार, ४ मंडळ अधिकारी व २ ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या निलंबनाची घोषणा करण्यात आली. त्यानंतर १३ डिसेंबरला भंडारा जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच पालघर जिल्ह्यातील मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांवरही कारवाई जाहीर करण्यात आली. ही कारवाई नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. हे सर्व निलंबन आदेश तत्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

### राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी संघाच्या प्रमुख मागण्या

१२ व १३ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर केलेले सर्व निलंबन आदेश पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करावेत, निलंबनाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार स्पष्ट व आदर्श कार्यप्रणाली निश्चित करावी, नायब तहसीलदार व इतर संवर्गांचे सुधारित ग्रेड पे व वेतनश्रेणी लागू कराव्यात, महसूल सेवक संवर्गाच्या दीर्घकालीन प्रलंबित मागण्या मंजूर कराव्यात, महसूल विभागाचा सुधारित आकृतीबंध तात्काळ मंजूर करावा, नायब तहसीलदार पदासाठी खात्यांतर्गत परीक्षा सुरू करावी, अर्धन्यायिक व हक्क नोंदीच्या प्रकरणात थेट फौजदारी कारवाई ऐवजी विभागीय चौकशीची प्रक्रिया राबवावी अशा प्रकारच्या मागण्या महसूल अधिकारी व कर्मचारी महासंघाने मुख्यमंत्री यांनादिलेल्या निवेदनात केल्या.

### सोलापूर जिल्ह्यातील १२९७ कर्मचाऱ्यांचा संपात सहभाग

महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटना सोलापूर शाखेच्या वतीने आज दुसऱ्या दिवशीही १२९७ कर्मचारी सामुहिक रजेवर असल्याबाबत एक निवेदन देण्यात आले आणि शासनाच्या वतीने आम्हा न्याय मिळेपर्यंत हे आंदोलन चालूच राहणार असल्याचा इशारा दिला आहे. हे निवेदन देताना शंतनू गायकवाड, धैर्यशील जाधव, अमरनाथ भिंगे, लक्ष्मीकांत आयगोळे, रविराज नष्टे, गजानन गायकवाड, खंडू भोसले, रणजीत म्हेत्रे, गंगाधर हाके, समाधान राऊत, संदीप माने, अनिल पवार, कदम, अजित कांबळे, एफएम शेख, श्रीकांत घुगे, प्रशांत गाडे, केतन राचमाले, सोमय्या स्वामी, सुहास म्हेत्रे, झारी, ज्ञानेश्वर कराळे, महेश निलंगे, वैभव मिसाळ आदींची उपस्थिती होती.

## महत्वाचे...



### युवती अध्यक्ष पूजा धोत्रे यांचा शिवसेनेला जय महाराष्ट्र करत राष्ट्रवादीत प्रवेश

**सोलापूर, दि.१७ डिसेंबर-**

आगामी सोलापूर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांमधे वेगवान घडामोडी घडताना दिसत आहेत. नगरसेवक होण्यासाठी अनेकजण पदाचा त्याग करून अन्य पक्षात प्रवेश करत असताना दिसून येत आहेत. सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक सोमवारी जाहीर होताच मंगळवारी सोलापुरातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला धक्का बसला आहे. युवती अध्यक्षा पूजा धोत्रे यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. राष्ट्रवादी भवनात मान्यवरांच्या उपस्थितीत प्रवेश केल्यानंतर प्रभाग क्रमांक १८ मधून ओबीसी किंवा सर्वसाधारण जागेवर निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक म्हणून अर्ज घेतला आहे. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत आपण प्रभाग क्रमांक १८ मधून ओबीसी किंवा सर्वसाधारण महिला जागेवर निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक म्हणून अर्ज घेतला असल्याचे पूजा धोत्रे यांनी सांगितले. याशिवाय पद्मशाली युवकचे माजी अध्यक्ष बालाजी दोंता आणि समीर देशमुख यांनीसुद्धा मंगळवारी राष्ट्रवादी भवनात येऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला आहे. आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी आपण जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणण्यासाठी शहराध्यक्ष कार्याध्यक्ष तसेच सर्व पदाधिकाऱ्यांसोबत पक्षाचे काम करणार असल्याचे दोंता आणि देशमुख यांनी सांगितले.

### लोकमंगल बँकेजवळून होंडा शाईन दुचाकी गेली चोरीला

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

अज्ञात चोरट्यांकडून पार्क केलेली होंडा शाईन मोटारसायकल चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना शहरातील किल्ला बगिचा रोड परिसरात लोकमंगल बँकेजवळ घडली आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवार पेठ, सोलापूर येथील रहिवासी सुनिल दिगंबर अंजिखाने (वय ४५) यांनी दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजण्याच्या दरम्यान त्यांनी आपली काळ्या रंगाची होंडा शाईन मोटारसायकल एमएच १३ बीके ५०८६) किल्ला बगिचा रोड येथील लोकमंगल बँकेच्या गेटजवळ पार्क केली होती. मात्र परत येऊन पाहिले असता सदर मोटारसायकल तेथे आढळून आली नाही. चोरीस गेलेल्या मोटारसायकलीची किंमत अंदाजे १५ हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेची तक्रार दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १०.३१ वाजता दाखल करण्यात आली असून, फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल कसबे हे करीत आहेत.





### भक्तीच्या प्रकाशात इंगळे महाराजांना ५४ दिव्यांनी ओवाळणी

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

सोलापुरातील अध्यात्मिक स्तंभ म्हणजे सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप सुधाकर महाराज इंगळे असल्याचे गौरवोद्गार पतंजली किसान सेवा समिती जिल्हा प्रभारी, आधार युवा ग्रुपचे प्रमुख, तज्ञ योगशिक्षक असलेले भगवान बनसोडे यांनी काढले. अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच सोलापुरातील ख्यातनाम कीर्तनकार ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे यांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त आधार योगा ग्रुप आणि श्री संत मुक्ताई प्रतिष्ठान यांच्या वतीने भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात 'राम कृष्ण हरी' या भजनाने करण्यात आली. या भजनाला गायनाचार्य ह.भ.प. तानाजी महाराज बेलेराव यांनी स्वर साथ दिली, तर सुप्रसिद्ध मृदुंग वादक दिलीप वाघमारे यांनी मृदुंगावर साथसंगत केली. यानंतर प्रमुख मान्यवर हेमंत पिंगळे, चंद्रकांत पवार, पतंजली योगाचे स्वाती राऊत, बसवराज उंबर्जे यांच्यासह उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर आधार योगा ग्रुप आणि श्री संत मुक्ताई प्रतिष्ठानच्या वतीने ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे यांचा मुख्य सत्कार करण्यात आला. महाराजांचा ५४ वा वाढदिवस असल्याने ५४ दिव्यांनी ओवाळणी घालून त्यांचा वाढदिवस भक्तिभावात साजरा करण्यात आला. या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाने उपस्थित भाविकांमध्ये भक्तीमय वातावरण निर्माण झाले. हा कार्यक्रम संजय जगताप, विजय जगताप, शंकर चौगुले, विलास चिंचोलकर, व्ही डी पाटील, सावंत साहेब, नाना कुरडे, मच्छिंद्र पाटील तसेच मुक्ताई महिला योगा ग्रुपच्या सहकार्यामुळे यशस्वी झाला. सूत्रसंचालन अविनाश अलदर यांनी केले. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.

**सोलापुरातील अध्यात्मिक स्तंभ इंगळे महाराज**

## आचारसंहिता भंगाच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करावी : डॉ. सचिन ओम्बासे

**मनपा आयुक्त कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक अधिकाऱ्यांची आढावा बैठक**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर -**

ोलापूर : महापालिका निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता, निष्पक्षता व कायदेशीर नियमांचे पालन अत्यंत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व राज्य निवडणूक आयोगाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे. निवडणूक काळात आचारसंहिता भंगाच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे, राजकीय पक्ष व उमेदवारांशी समन्वय राखणे तसेच कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे आदेश निवडणूक निर्णय अधिकारी तथा मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या निमित्ताने आज सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक (सह) निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आढावा बैठक झाली. या बैठकीत निवडणूक कार्यक्रमाची अंमलबजावणी, नामनिर्देशन प्रक्रिया, छाननी, उमेदवारी माघार, मतदान व्यवस्थापन, मतमोजणी प्रक्रिया तसेच निवडणूक आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक अधिकाऱ्यांना त्यांच्या प्रभागनिहाय जबाबदाऱ्या स्पष्टपणे सांगण्यात आल्या. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक शांततापूर्ण, निर्भय व विश्वासार्ह वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे,उपायुक्त आशिष लोकरे, मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, उपजिल्हाधिकारी, रो.ह.यो अंजली मरोड,उपजिल्हाधिकारी, भूसंपादन अभिषेक देशमुख,उपविभागीय अधिकारी सोलापूर सदाशिव पडदुणे, उपविभागीय अधिकारी, भैरप्पा माळी,उपविभागीय अधिकारी, विजया पांगारकर, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय अधिकारी, जयश्री आव्हाड , सहायक आयुक्त गिरीष पंडित, निवासी नायब तहसीलदार राजाभाऊ भंडारे, नायब तहसीलदार सुधाकर दाहिजे, शितल कन्हेरे, विकास पवार, नगर अभियंता सारिका अक्कूलवार उपस्थित होते.

## पालिका निवडणुकीत महाविकास आघाडीला विजयी करा



**नरसय्या आडम यांचे आवाहन**

**निवृत्तीवेतन ७१ हजार रुपये पक्षाच्या निवडणूक निधीसाठी सुपूर्द**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी लोकशाही बळकट करावी. धर्मांध आणि सांप्रदायिक विषारी प्रचाराला आळा घालण्यासाठी लाल सैनिक पेटून उठले पाहिजेत. सोलापूरच्या जनतेला खोटी विकासाची स्वप्ने विकणाऱ्या सत्ताधाऱ्यांना घरचा रस्ता दाखवण्याचा निर्धार करा, असे आवाहन ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉम्रेड नरसय्या आडम मास्तर यांनी केले.

भारत कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) ची सर्वसाधारण सभा बुधवार, दि. १७ डिसेंबर रोजी पक्षाचे मध्यवर्ती कार्यालय, दत्तनगर येथे पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांबरोबर पार पडली. सभेचे अध्यक्षस्थान माजी नगरसेविका कॉम्रेड कामिनी आडम यांनी भूषवले. मंचावर माजी नगरसेविका नलिनी कलबुर्गी, ॲड. अनिल वासम उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉम्रेड नरसय्या आडम मास्तर यांनी आपल्या एक महिन्याचे निवृत्तीवेतन ७१ हजार रुपये निवडणूक निधी म्हणून पक्षाचे जिल्हा सचिव मेजर कॉम्रेड युसुफ शेख यांच्याकडे सुपूर्द केले. तसेच, कॉम्रेड गोदूताई परुळेकर महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कर्मचारी व प्रभारी यांनी १ लाख रुपये, दत्तनगर कार्यालयातील कार्यकर्ते व सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी १ लाख रुपये, तर माजी नगरसेविका कॉम्रेड नलिनीताई कलबुर्गी व त्यांच्या कुटुंबीयांनी २५ हजार रुपये निवडणूक निधी म्हणून पक्षाकडे दिले. सभेचे प्रास्ताविक पक्षाचे जिल्हा सचिव कॉम्रेड मेजर युसुफ शेख यांनी केले. महानगरपालिका निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी कार्यकर्ते सज्ज राहावेत. भांडवलशाही प्रवृत्ती व सत्ताधाऱ्यांच्या अवगुणांना मातीमोल करून लोकशाही मार्गाने मुकाबला करूया, असे आवाहन माकपचे राज्य सचिव मंडळ सदस्य एम. एच. शेख यांनी केले.

## जुन्या सिद्धेश्वर मंदिरासह रेवणसिद्धेश्वर मंदिरास रंगरंगोटी सुरू

**लगबग ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेची**

**९०० लिटर विविध रंगांचा होतोय वापर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांची यात्रा दृष्टीक्षेपात आली असून, यात्रेच्या पार्श्वभूमीवर शहरात तयारी सुरू झालेली आहे. यात्रेच्या अनुषंगाने शहरातील विविध मंदिर आणि मंदिर परिसरात मंदिर समितीच्या वतीने रंग-रंगोटीचे कामकाजास सुरुवात करण्यात आली आहे. जुने सिद्धेश्वर मंदिर परिसरात रंगरंगोटी करण्याच्या कामाचा श्री गजानन पूजनाने शुभारंभ करण्यात आला. रेवणसिध्देश्वर मंदिर रंगवण्यास सुरुवात करण्यात आली आहे.



यात्रेच्या अनुषंगाने दरवर्षी एक महिना अगोदर या कामकाजास सुरुवात होते. बुधवारपासून रंगरंगोटीच्या कामकाजाचा सुरुवात झाली असून एक महिन्यानंतर हे काम पूर्ण होणार आहे. यात्रेच्या अगोदर हे काम पूर्ण करणे आवश्यक असते. त्यानंतरच यात्रेच्या विविध धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात होते.

### मंदिर रंगवण्यासाठी लागणारे साहित्य

सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षी देखील यात्रेनिमित्त शहरातील जुने सिद्धेश्वर मंदिर, रेवन सिद्धेश्वर मंदिर, गुरुभेट शिवलिंग मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर, श्री सिद्धेश्वर मंदिर व परिसर परिसरातील ६८ शिवलिंग आणि अष्टविनायक मंदिर रंगविण्यात येते. १० जानेवारीपर्यंत याचे कामकाज चालते. यासाठी ऑईल पेंट, अपेक्स, ऑईलबॉण्ड, वॉटरप्रूफ पेंट, सिमेंट पेंट, अशा विविध प्रकारचे सुमारे ९०० लिटर रंग २० रोलर, १५ ब्रश यांची गरज लागते. सर्व प्रथम डागडुजी करून त्यावर प्रायमर लावून रंगकाम केले जाते. यासाठी कामगार १६ राबतात. त्यामध्ये चार कामगार हे उत्तर प्रदेश मधून आलेले आहेत. तर उर्वरित कामगार हे सोलापूर जिल्ह्यातील आहेत. यात्रेच्या अगोदर रंगकामाचे काम पूर्ण केले जाते. एक सेवा म्हणून श्रींचे काम गेल्या अनेक वर्षांपासून करत आहे. सकाळी सात वाजल्यापासून ते संध्याकाळी सात वाजेपर्यंत हे काम सुरू राहते.

**- मनोज कडाळे, पेंटर**

### सोलापूर शहरात यूपी, बिहारी कामगारांची वाढतीय संख्या

ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांच्या यात्रेनिमित्त शहरातील विविध ६८ शिवलिंग, तसेच अष्टविनायक मंदिर, जुने सिद्धेश्वर मंदिर, रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसरास रंग देण्यासाठी यु.पी. आणि बिहार येथील कामगार येतात. सध्या यु.पी आणि बिहार येथील कामगारांची संख्या महाराष्ट्रात जास्त आहे. मनोज कडाळे यांच्याकडे चार ते पाच यु.पी बिहारी कामगारांची संख्या आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ब्राह्मण समाज महासंघ महिला आघाडीच्या अध्यक्षपदी मोहिनी पतकी

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

अखिल भारतीय ब्राह्मण समाज महासंघ महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सोलापूरच्या माजी नगरसेविका व माजी विरोधी पक्षनेत्या प्रा.मोहिनी विजय पतकी यांची निवड करण्यात आली.

प्रा.पतकी यांच्या रूपाने महाराष्ट्रातील महिलेस राष्ट्रीय अध्यक्ष होण्याचा मान पहिल्यांदाच मिळाला आहे. संघटनेच्या प्रदेश कार्यकारिणीची बैठक जुळे सोलापूर भागातील मांगल्य मंगल कार्यालयात पार पडली. त्यावेळी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी प्रा. पतकी यांच्या निवडीची घोषणा केली. निवड आगामी तीन वर्षांकरिता राहणार आहे. अखिल भारतीय



ब्राह्मण महासंघ राष्ट्रीय महिला आघाडी अध्यक्ष पदाचा सन्मान महाराष्ट्राला प्रथमच मिळाला आहे. या पदाला न्याय देण्यासाठी पुढील काळात देशभर विविध राज्यांच्या मधून महिलांचे संघटन मजबूत कसे होईल यासाठी प्रयत्न केला जाईल, असा निर्धार प्रा. पतकी यांनी व्यक्त केला.



# कार्यकर्त्यांसह डॉक्टर, इंजिनिअरसह सीए 'नगरसेवक' उमेदवारीच्या शर्यतीत!

## • दुसऱ्या दिवशीही अनेकांनी दिल्या मुलाखती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

येथील शहर-जिल्हा भाजप पक्ष कार्यालयात सलग दुसऱ्या दिवशी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. आज प्रभाग क्रमांक ११ ते २० या १० प्रभागांसाठी राजकीय पुढाऱ्यांसह डॉक्टर, इंजिनिअर, सीए, आयटी अभियंता अशा सुशिक्षित वर्गानेही उमेदवारीसाठी मुलाखत दिली आहे.



सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात मंगळवारपासून मुलाखती घेण्यास सुरुवात करण्यात आली. मंगळवारी प्रभाग क्रमांक १ ते १० मधील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या. बुधवारी सकाळच्या सत्रात प्रभाग क्रमांक ११ ते १५ तर दुपारच्या सत्रात १६ ते २० मधील इच्छुकांच्या मुलाखती पार पडल्या. मंगळवारी बिपीन धुम्मा यांनी उमेदवारी न दिल्यास काहीतरी जीवाचे बरंवाईट करण्याचा इशारा दिल्याने बुधवारी इच्छुकांना प्रसिद्धी माध्यमांना प्रतिक्रिया न देण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या. दरम्यान, जर कोणी माध्यमांना मुलाखत दिली तर त्यांचा अर्ज रद्द करण्याचा इशारा स्थानिक कोअर कमिटीने दिल्याने इच्छुक मुलाखत देवून आल्या पावली माघारी जाताना दिसून आले.

पत्रकारांना कोणीही प्रतिक्रिया दिल्यास उमेदवारीतून पत्ता कटचा इशारा ऐकून कोणीही मीडियासमोर मुलाखत देण्यास तयार झाला नाही. इतकेच नाहीतर मुलाखत घेतानाचे चित्रीकरण करायला प्रतिनिधींनाही बुधवारी मज्जाव करण्यात आला होता. उद्याही एक दिवस मुलाखती होणार असून, यानंतर इच्छुक उमेदवारांची शहरातील तीनही आमदार आणि पालकमंत्री जयकुमार गोरे एकत्रित बसून यादी फायनल करणार आणि प्रदेश कार्यालयाकडे ही यादी पाठवतील. प्रदेशकडून ग्रीन सिग्नल मिळाल्यानंतर अंतिम यादी फायनल होणार असल्याचे कोअर कमिटी सदस्यांनी सांगितले. दरम्यान, उद्या गुरुवारी प्रभाग क्रमांक २१ ते २६ च्या मुलाखती पार पडणार आहेत.

### सुशिक्षित तरुणांचा ओढा भाजपकडे वाढला



शहरातील सुशिक्षित तरुणांचा ओढा सध्या भाजपकडे वाढत असून, डॉक्टर, इंजिनिअर, सीए, आयटी अभियंते निवडणूक लढवण्यास इच्छुक असून, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सबका साथ सबका विकासला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यामुळे अशा अभ्यासू आणि दूरदृष्टी असलेल्या युवकांनाही या निवडणुकीत प्रदेश पातळीवरून संधी मिळण्याची शक्यता आहे.

**- रोहिणी तडवळकर, शहराध्यक्षा, भाजप**

### माध्यमांना प्रतिक्रिया दिली की पत्ता कट!

मुलाखत देवून आल्यानंतर बिपीन धुम्मा यांनी माध्यमांशी बोलताना भाजपाला उमेदवारी नाही दिल्यास थेट जीवाचं बरंवाईट करण्याचा इशारा दिला होता. यामुळे भाजपा गोटात एकच खळबळ उडाली होती. यामुळे भाजपच्या स्थानिक कार्यकारिणीने दुसऱ्या दिवशी सावध पवित्रा घेतला आणि सर्व इच्छुकांना प्रसिद्धी माध्यमांना प्रतिक्रिया न देण्याच्या सक्त सूचना दिल्या. इतकेच नाहीतर जर कोणी माध्यमांना मुलाखत दिली तर त्यांचा अर्ज रद्द करण्याचा इशारा स्थानिक कोअर कमिटीने दिल्याने इच्छुक मुलाखत देवून आल्या पावली माघारी जाताना दिसून आले. तसेच मुलाखत घेतानाचे चित्रीकरण करायला देखील बुधवारी माध्यम प्रतिनिधींना मज्जाव करण्यात आला होता.

# राष्ट्रवादीला काँग्रेस, एमआयएमसह पद्मशाली समाजाचा मोठा प्रतिसाद

## दोन दिवसात इच्छुकांचा आकडा दोनशे पार!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर**

महानगरपालिका निवडणुकीसाठी ''अब की बार ७५ पार ''चा नारा घेऊन सोलापुरातील अजितदादा पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मंगळवारपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाल्यानंतर पहिल्याच दिवशी इच्छुक उमेदवारांनी शतक पार केले. बुधवारी दुसऱ्यादिवशी पुन्हा इच्छुक उमेदवारांनी शंभरचा आकडा पार केला आहे. बुधवारी दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच जुनी मिल कंपाऊंड येथील राष्ट्रवादी भवनात उमेदवारी अर्जासाठी इच्छुकांनी मोठी गर्दी केली होती.



काँग्रेस, एमआयएमसह पद्मशाली समाजातील इच्छुकांनी मोठा प्रतिसाद दिला.सर्वसामान्य जनतेला सोबत घेऊन जाणारा पक्ष म्हणून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडे पाहिले जाते. मंगळवारी अर्ज दाखल करण्याच्या पहिल्या दिवशी १२२ तर बुधवारी ११५ जणांनी उमेदवारी अर्ज घेऊन दाखल केले. दोन दिवसात २३७ जणांनी इच्छुक असल्याचे अर्ज दाखल केले. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल यांच्याकडून इच्छुकांनी अर्ज घेतल्यानंतर जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले यांच्याकडे सर्वांनी आपले अर्ज सुपूर्द केले. यावेळी युवक नेते सुहास कदम, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, महिला कार्याध्यक्ष चित्रा कदम, माजी महापौर मकबूल मोहोळकर, माजी उपमहापौर आप्पाशा म्हेत्रे, शशिकांत बापू कांबळे, युवती अध्यक्ष किरण माशाळकर, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष अनिल बनसोडे, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बसवराज कोळी, सांस्कृतिक नाट्य विभाग अध्यक्ष आशुतोष नाटकर, सोशल मीडिया शहराध्यक्ष वैभव गंगणे, मध्य विधानसभा अध्यक्ष अल्मेहराज आबादीराजे आदी उपस्थित होते.

### आजित पवार यांच्यावर सोलापूरकर जनतेचा विश्वास

सोलापूर राष्ट्रवादीसाठी अत्यंत आनंदाची व समाधानकारक अशी बाब आहे. अत्यंत कमी वेळेत आणि वर्षानुवर्षे सोलापूरकरांच्या समस्या सोडवल्यामुळे तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सोलापूरच्या विकासात मोठे योगदान असल्यामुळेच आज राष्ट्रवादीकडे केवळ दोन दिवसात इच्छुकांच्या उमेदवारांचा आकडा २०० पार गेला आहे. यावरूनच अजित पवार यांच्यावर सोलापूरकर जनतेचा तसेच अन्य पक्षातील पदाधिकाऱ्यांचा विश्वास असल्याचे सिद्ध झाले आहे.

**- संतोष पवार, शहराध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सोलापूर**

### ▶▶ महत्वाचे...



## जागतिक ध्यान दिनानिमित्त २१ डिसेंबरला ध्यान शिबिर

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

रविवार २१ डिसेंबर रोजी जागतिक ध्यान दिन निमित्त सोलापूर पिरॅमिड स्पिरिच्युअल ट्रस्ट यांच्या वतीने हैद्राबाद रोड जुना विडी घरकुल, यशोधरा हॉस्पिटल जवळील श्री गणेश पिरॅमिड ध्यान मंदिर येथे सकाळी ११ वाजता तसेच हेरिटेज बॅंक्वेट हॉल येथे पहाटे ६.३० वाजता विशेष ध्यान शिबिराचे आयोजन केले आहे. ध्यानधारणेच्या फायद्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे, तणाव कमी करणे आणि मानसिक शांतता व जागतिक ऐक्य वाढवणे हा याचा उद्देश आहे. ज्यामध्ये भारत एक प्रमुख जागतिक भागीदार आहे आणि २१ डिसेंबरची निवड हिवाळी संक्रांतीमुळे झाली आहे, जी अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचे प्रतीक आहे. ध्यानामुळे मन स्थिर होते व अंत:करणात शांतता प्रस्थापित होते. नियमित ध्यानामुळे तणाव कमी होतो, आरोग्य व सकारात्मकता वाढते. या ध्यान शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापूर पिरॅमिड स्पिरिच्युअल ट्रस्टने केले आहे.



# राजेंद्र कलंत्री, रियाज खरादी यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर**

सोलापूर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर राजेंद्र कलंत्री आणि एमआयएम पक्षाचे गटनेते रियाज खरादी यांनी बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. हा पक्षप्रवेश मुंबई येथे पार पडला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आणि राज्याचे कृषिमंत्री तसेच सोलापूर जिल्ह्याचे संपर्क मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या पक्षप्रवेशासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेश कार्याध्यक्ष वसीम बुऱ्हाण यांनी विशेष पुढाकार घेतला.

राजेंद्र कलंत्री हे सोलापूर शहरातील परिचित आणि अनुभवी राजकीय व्यक्तिमत्त्व असून त्यांनी उपमहापौरपदाच्या काळात अनेक विकासकामांत सक्रिय भूमिका बजावली आहे. तर रियाज खरादी हे एमआयएम पक्षाचे सोलापूर महानगरपालिकेतील गटनेते म्हणून कार्यरत होते. त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कामाची शहरात वेगळी ओळख आहे. या दोन्ही नेत्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रवेशामुळे सोलापूर शहराच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः अल्पसंख्यांक समाजासह सर्वसामान्य मतदारांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढेल, असा विश्वास पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.पक्ष प्रवेशानंतर उपस्थित नेत्यांनी संघटन मजबूत करण्यावर, सोलापूर शहराच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्यावर आणि येणाऱ्या काळात पक्षाची भूमिका अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात येईल, असे संकेत दिले. या कार्यक्रमाला मुंबईसह सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रवेशामुळे सोलापूरच्या राजकीय वातावरणात चांगलीच हालचाल निर्माण झाली आहे.

## काव्यप्रेमींचे भंडाऱ्यात रविवारी राज्य साहित्य संमेलन

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

राज्यभरातील साहित्य प्रेमींचा मंच म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काव्यप्रेमी शिक्षक मंचच्यावतीने १६व्या राज्य साहित्य संमेलनाचे आयोजन भंडारा येथे रविवार, २१ डिसेंबरला सकाळी ८ ते सायं. ६ वाजेपर्यंत ए.के. सेलिब्रेशन हॉल येथे केल्याची माहिती राज्याध्यक्ष आनंद घोडके यांनी दिली. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते हे आहेत. अभिनेते राजाभाऊ धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून लेखक राजेंद्र फंड यांची उपस्थिती राहणार आहे. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष कवी दीपक सपकाळ हे असणार आहेत. यावेळी राज्याध्यक्ष आनंद घोडके, सचिव कालिदास चवडेकर, कार्याध्यक्ष कृष्णा शिंदे, उपाध्यक्ष प्रमोद बाविस्कर, सहसचिव जया नेरे, आदी उपस्थित राहणार आहेत.

# सोलापूर विद्यापीठ इंजिनिअरिंगचे ८ नवीन अभ्यासक्रम सुरू करणार




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. आगामी २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठ प्रशासनाने इंजिनिअरिंग फॅकल्टीचे ८ नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे, विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच इंजिनिअरिंगचे कोर्सेस थेट विद्यापीठ संकुलात सुरू होणार असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी दिली.

**बी.टेकची मिळणार पदवी मिळणार : कुलगुरू**

या नवीन तांत्रिक अभ्यासक्रमांना नवी दिल्ली येथील ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशनकडून मान्यता मिळाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या पोर्टलवर या अभ्यासक्रमांची माहिती अपलोड झाल्यानंतर २०२६-२७च्या प्रवेश प्रक्रियेला अधिकृतपणे सुरुवात होईल. हे सर्व अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना सोलापूर विद्यापीठाची बी.टेक ही पदवी प्रदान केली जाणार आहे.

### विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी उपयुक्त



''सोलापूर विद्यापीठाने काळाची गरज ओळखून आधुनिक आणि रोजगाराभिमुख कोर्सेसवर भर दिला आहे. इंजिनिअरिंग फॅकल्टीचे हे अभ्यासक्रम प्रथमच सुरू करत आहे. हे कोर्सेस विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतील.''

**- प्रा. डॉ. प्रकाश महानवर, कुलगुरू**

### विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी



''या निर्णयामुळे सोलापूर आणि परिसरातील विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंगच्या उच्च शिक्षणासाठी इतर शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. विशेषतः ए आय, डाटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटी सारख्या जागतिक मागणी असलेल्या विषयांचे शिक्षण आता स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे.''

**- प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्र.कलगुरू**

### नवीन अभ्यासक्रम आणि प्रवेश क्षमता

आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग (६०), डाटा सायन्स (६०), सायबर सिक्युरिटी (६०), बायोटेक्नॉलॉजी (२०) केमिकल टेक्नॉलॉजी (२०), फूड टेक्नॉलॉजी (२०), नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (२०), सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी (२०).

# १२ जागांसाठी ३७ उमेदवार होते रिंगणात

**सोलापूर नगरपालिकेच्या स्थापनेनंतर १८५२ साली प्रथम सरकार नियुक्त तेरा सभासदांचे पहिले म्युनिसिपल बोर्ड होते. त्यानंतर सोलापूर नगरपालिकेची पहिली निवडणूक दि. २४ मार्च १८८३ रोजी झाली होती. या पहिल्याच निवडणुकीत १२ जागांसाठी एकूण ३७ उमेदवार उभे होते. एकूण मतदारांची संख्या २ हजार ४०८ इतकी होती. प्रत्यक्ष मतदान ८३४ मतदारांनी केले होते. ३४.६३ टक्के मतदान झाले होते. दरम्यान, राव बहादूर आप्पाजी देगांवकर हे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष ठरले.**

सन १८५२ मध्ये सोलापूर नगरपालिका स्थापन केल्याबद्दल सरकारनें जो हुकूम काढला. त्यामध्ये जिल्ह्याचे कलेक्टर हे अधिकारपरत्वे अध्यक्ष व त्यांचे जोडीला ९ सरकारनियुक्त (बिन सरकारी) नागरीक कमिशनर (सभासद) अशी नेमणूक केलेली होती. कायद्यांत सभासदांची संख्या मर्यादित केलेली नव्हती. त्यामुळे पुढच्याच वर्षी कारभाराच्या सोईसाठी म्हणून तीन स्थानिक बड्या सरकारी अंमलदारांना जादा कमिशनर म्हणून नेमण्यात आले. अशा एकूण १३ सभासदांनी सोलापूर नगरपालिकेचा पहिला कारभार सुरू केला. पहिले म्युनिसिपल बोर्ड होते.

या १३ सभासदांमध्ये थॉमस चार्लस लाफनन (कलेक्टर व अध्यक्ष), बुइल्यम रेमर ( डीपोटी मॅजिस्ट्रेट), रावबहादूर सखाराम खंडो (प्रिन्सिपॉल सदर अमीन), रावबहादूर मोरोवा सदाशिव दप्तरदार, नारायण जनार्दन सोनी, लक्ष्मण नरसू चाटी, नरसू विठ्ठल नखाते, केरोजीराव देशमुख, धर्मराव थोबडे, गुजर सखाराम खुशाल, नैनसुख शोभाराम यांचे गुमास्ते ठाकुरदास, चिंतो सखाराम आणि हुसेनसाहेब रेशीमगार यांचा या म्युनिसिपल बोर्डात समावेश होता. या सभासदांच्या नेमणुकीची मुदतही ठरविण्यांत आली नव्हती. दरम्यान, दि. २७ डिसेंबर १८८२ च्या सरकार ठरावानुसार सोलापूर नगरपालिकेच्या पहिल्या निवडणुकीसंबंधींचे नियम नगरपालिकेच्या दि. ३ फेब्रुवारी १९८३ च्या सभेत मंजूर झाले. दरसाल किमान ५ रुपये प्रत्यक्ष मुन्सिपल कर देणाऱ्या इसमास मतदानाचा हक्क दिला गेला. शहरातून एकूण ६ वॉर्डातून १२ सभासद निवडले गेले. त्यांची विभागणी अशा पद्धतीने केली होती. वॉर्ड नंबर आणि पेठा कंसात सभासद निवडावयाची संख्या याप्रमाणे - १ - कसबा, थोरला महारवाडा व रेवणी या पेठा (३), २ - मंगळवार व राणी पेठ (३), ३ - शुक्रवार पेठ (२), ४ - जोडभावी, धाकटा महारवाडा, गुरूजी, बाबू, गणेश, साखर, मरगमपट्टी व शनिवार पेठा ( २), ५ - सोमवार, सिद्धेश्वर, बेगम, पाच्छा कापूस बाजार पेठ (१), ६ - कँप, सदरबाजार, मोदीखाना, गिरण्या आणि पोलीसलाईन्स (१).




ज्या उमेदवारास मत द्यावयाचें असेल त्याचें नांव मतदाराने छापील मत पत्रिकेवर लिहावे. स्वतः लिहितां येत नसेल, तर दुसऱ्याकडून लिहवून घ्यावे असा नियम होता. १८५२ ते १८८३ या काळात शासन नियुक्त सभासद होते. त्यात अधिकारी व प्रतिष्ठित नागरिकांचा समावेश होता.

या नियमानुसार सोलापूर नगरपालिकेची पहिली निवडणूक दि. २४ मार्च १८८३ रोजी झाली. या पहिल्याच निवडणुकीत १२ जागांसाठी एकूण ३७ उमेदवार उभे होते. एकूण मतदारांची संख्या २ हजार ४०८ इतकी होती. प्रत्यक्ष मतदान ८३४ मतदारांनी केले होते. ३४.६३ टक्के मतदान झाले होते. यामध्ये वार्ड नं. १ मधील विजयी उमेदवार - गणेश बाबाजी माटे, बाळकृष्ण व्यंकटेश करमाळकर, गणेश जिवाजी केळकर ,वार्ड नं. २- सिद्रामप्पा रुद्राप्पा पसारे , नारायण गोविंद, मल्लप्पा बसप्पा वारद, वार्ड नं. ३- काशी सुलतान दोस्तमहंमद , प्रभाकर बाळाजी केसकर, वार्ड नं. ४- किसनलाल रामगोपाळ , दिनकर बल्लाळ , वार्ड नं. ५ - अबदुलासाहेब हुसेनसो पानगल , वार्ड नं. ६ - नरसय्या कालय्या मास्तर आदी १२ जण पहिले लोकनियुक्त सभासद होते.

त्यानंतर १८८४च्या सुधारणा कायद्याप्रमाणे पहिल्यांदा लोकनियुक्त अध्यक्षांची निवड करण्यात आली. दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीचा निर्णय दि. २ जुलै १८८५ रोजी जाहीर करण्यात आला. त्यानंतर भरलेल्या सोलापूर नगरपालिकेच्या नव्या बोर्डाच्या सभेत दि.५ ऑगस्ट १८८५ रोजी मतदानाद्वारे लोकनियुक्त अध्यक्ष निवडण्यात आला. यामध्ये राव बहादूर आप्पाजी रावजी देगांवकर यांची पहिले अध्यक्ष म्हणून सात सभासदांच्या मताधिक्याने निवड झाली होती.नागरिकांनी मतदानाद्वारे निवडलेले १२ तर शासनाने नेमलेले १४ असे २६ सभासद या नव्या नगरपालिका मंडळात होते. ऑगस्ट १८८५रोजी पहिल्या लोकनियुक्त नगराध्यक्षांची निवड झाली. राव बहादूर आप्पाजी देगावकर हे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष ठरले. दरम्यानच्या काळात साधारणतः सन १८७३ मध्ये सोलापूर नगरपालिकेचा कारभार (सध्याच्या नवी पेठ येथील प्राथमिक शिक्षण मंडळ) स्वतःच्या दगडी बिल्डिंगमध्ये सुरू झाला.

### पारतंत्र्यात नगरपालिकेवर फडकविले राष्ट्रीय निशाण

सोलापूर नगरपालिकेवर राष्ट्रीय झेंडा फडकवण्यात यावा या ठरावानुसार दि. ६ एप्रिल १९३० रोजी देशभक्त अण्णासाहेब भोपटकर यांच्या हस्ते सध्याच्या नवी पेठ येथील नगरपालिकेच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण फडकवण्यात आले. पारतंत्र्यातही दि. ९ ते १२ मे १९३० दरम्यान सोलापूरकरांनी स्वातंत्र्य अनुभवले. आक्रमक क्रांतिकारी लढा उभारल्याने ब्रिटिशांनी सोलापुरात मार्शल लॉ पुकारला. मार्शल लॉच्या काळात नगरपालिकेवर उभारण्यात आलेले राष्ट्रीय निशाण उतरावे असे फर्मान ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सोडले मात्र त्याला न जुमानता सभासदांनी सर्वानुमते केलेली कृती त्यांच्या संमतीशिवाय मी मागे घेऊ शकत नाही असे बाणेदार उत्तर देऊन निशाण उतरवण्यास तत्कालीन नगराध्यक्ष माणिकचंद शहा यांनी स्पष्ट नकार दिला. यामुळे त्यांना अटक करून विजापूरच्या तुरुंगात ठेवण्यात आले. यामुळेच माणिकचंद शहा यांना तिरंग्याचे अभिमानी नगराध्यक्ष म्हणून संबोधले जाते.

## १८८३मध्ये राव बहादूर आप्पाजी देगांवकर पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष



### कामगार प्रतिनिधी आबासाहेब किल्लेदार झाले नगराध्यक्ष

कामगार प्रतिनिधी असलेले आबासाहेब किल्लेदार हे नगराध्यक्षपदी विराजमान झाले होते. कामगार प्रतिनिधी एका मोठ्या अध्यक्षपदावर निवडून आल्याचे किल्लेदार हेच महाराष्ट्रातील पहिले उदाहरण असल्याचे त्यावेळी मानले जात होते. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर ते लक्ष्मी-विष्णु मिलमध्ये कामाला लागले. आज ते तेथे सुपरवायझर म्हणून काम केले. १९४९ साली झालेल्या त्रैवार्षिक निवडणुकीमध्ये ते प्रथम निवडून आले, आणि नंतर दुसऱ्याच वर्षी म्हणजे ६ नोव्हेंबर १९५० रोजी त्यांची अध्यक्षपदी निवड झाली. १९५२ सालच्या निवडणुकीमध्येही ते प्रचंड बहुमताने निवडून आले आणि त्याच वर्षासाठी (१९५२-५३) त्यांची नगराध्यक्ष म्हणून दुसऱ्यांदा ४ डिसेंबर १९५२ रोजी निवड झाली होती. किल्लेदार यांच्या कारकिर्दीमध्ये (१९५०-५१) प्रेस कॉन्फरन्सची प्रथा नव्यानेच चालू करण्यांत आली होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३००

**दीपा आणि प्रकाशा । एकवंकीचा पाडू जैसा ।**
**तो माझ्या ठायी तैसा । मी तयामाजीं ।।**

योगाने माणसाचे मन शुध्द आणि स्थिर होते. मनाच्या शुध्दीमुळे व स्थैर्यामुळे तो सर्वांकडे समदृष्टीने पाहतो. सर्व प्राणीमात्राच्या ठिकाणी आपणच आहोत व सर्व प्राणीमात्र आपल्या ठिकाणी आहेत. अशा दृष्टीने असा योगी पाहत असतो. अर्थात, आपल्यासह सर्व प्राणीमात्र एकाच ईश्वराचे अंश असल्याचे योगी पाहातो. प्राणिमात्राच्या दिखाऊ भेदाने त्याला वेगळेपणाचे अस्तित्व जाणवत नाही. योगी सर्व चराचरात समता, एकात्मता कशी पाहतो किंवा तो आपल्या पासून ईतरांना व ईतरापासून आपणाला वेगळे कसे समजत नाही, हे सांगतांना भगवंत म्हणाले, दीपा आणि प्रकाशा । एकवंकीचा पाडू जैसा । तो माझ्या ठायी तैसा । मी तयामाजीं ।। अर्थात दिवा आणि प्रकाश यांच्यामध्ये ज्या प्रकारची एकतेची भावना असते, त्याप्रमाणे तो माझ्याठिकाणी आणि मी त्याच्याठिकाणी असतो. दिवा आणि प्रकाश वेगळे असत नाहीत. त्या दोघांना वेगवेगळे करता येत नाही. पाण्यापासून ओलावा किंवा ओलाव्यापासून पाणी वेगळे नसते



तसे एकमेकांचे अस्तित्व योगामुळे एकरुपपणाचे निर्माण होते. अर्थात भिन्नता किंवा भेद नांवाचा प्रकार उरत नाही.

वस्त्रामध्ये सर्वत्र एकच धागा असतो. धागा केवळ उभा, आडवा लावल्याचे दिसते. धागा, उभा-आडवा जरी लावला तरी तो एकच असतो. तसेच एकात्मतेच्या दृष्टीने पाहिल्यास या जगरुपी वस्त्रातील सर्व प्राणीमात्ररुपीधागे एकच असल्याचे दिसते. या सर्व धाग्यांनी मिळून एकच वस्त्र बनते. या वस्त्रात, धाग्यात एकच परमात्म शक्ती आहे. भिन्नता नांवाचा प्रकारच इथे असत नाही. प्रत्येक प्राणीमात्रात एकच आत्मा आहे. शारिरीक दृष्टया भिन्न दिसत असले तरी प्रत्यक्षात ते एकच असल्याचे योगी समजतो. त्यामुळे त्याला लहान-मोठा, उच्च-नीच, स्त्री-पुरुष, गरीब- श्रीमंत असा कसलाच भेद दिसत नाही. तो समतेचे, एकात्मतेचे चालते-बोलते व्यासपिठच झालेला असतो. सर्व लोक जर असे समतेचे व्यासपीठ झाले तर आपसात भांडण-तंटे, वैर होण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही. जेव्हा भांडण तंटे, वैर, वादविवाद संपुष्टात येतील तेव्हा चोहीकडे सुख समाधान, शांती अनुभवायला मिळेल. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणा-या महात्म्यांची शांतीची, समतेची अपेक्षा आपल्या वर्तनातुन आपण पुर्ण करायला हवी आहे. योगी हा देहधारी असला तरीही त्याने देहाभिमान, मीपणा टाकुन दिला असल्याने त्याच्याकडे विषयवासना, आसक्ती अजिबात उरत नाहीत. ज्याकडे विषयवासना, आसक्ती नसते त्याला आत्मसुखाची, समतेची प्रचिती येत असते. अर्जुनाने स्वत:च्या ठिकाणी विश्व पहावे व सा-या विश्वाच्या ठिकाणी स्वत:चे रुप पहावे असे भगवंतांना वाटते. अर्जुन जेव्हा स्वत:ला विश्वाच्या ठिकाणी व विश्वाला स्वत:च्या ठिकाणी पाहिल तेव्हा त्याला फक्त साम्य दिसेल. या जगात साम्यापलीकडे मिळविण्या सारखे काहीच शिल्लक नाही. साम्य हेच अत्यंत श्रेष्ट असे साध्य असल्याचे भगवंत म्हणतात. ही साम्यवस्था आपणाला प्राप्त होऊन आपण आत्मसुखी होण्याचा व ईतरांना सुखी ठेवण्याचा प्रयत्न करायला हवा. आज आपल्या देशाला साम्यावस्थेची, एकरुपतेची म्हणजे समतेची अत्यंत गरज आहे. ही गरज पुर्ण करण्यात आपला पुढाकार अत्यंत महत्वाचा ठरणार आहे. आपला असा पुढाकार आपल्याबरोबर इतरांचा आनंद वाढवेल. जय जय राम कृष्ण हरी.

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार
दि. ११ डिसेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - मार्गशिर्ष कृ. चर्तुदशी
ऋतु - हेमंत
नक्षत्र- अनुराधा (२०.०६)
योग - धृति (१५.०५)
करण - विष्टी (१५.४७)
....राहू काल....
गुरुवार : दु. १.३० ते ३.००

दिनविशेष - १९६१: माजी क्रिकेटपटू लालचंद राजपूत यांचा जन्म.
१९७१: पत्रकार बरखा दत्त यांचा जन्म.
१९२८: उद्योजीका विमलाबाई गरवारे यांचा जन्म.
१९९५: राष्ट्रीय कीर्तनकार कमलाकरबुवा औरंगाबादकर यांचे निधन.
१९५२: कवी गारिमेला सत्यनारायण यांचे निधन.




## अजित राष्ट्रवादीच्या अल्पसंख्याक शहराध्यक्षपदी नजीब शेख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ डिसेंबर-**

काँग्रेसच्या अल्पसंख्यांक विभागाचे युवक अध्यक्ष नजीब शेख यांनी काही दिवसापूर्वीच राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. निवडणुकीच्या तोंडावर त्यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाच्या शहराध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे विद्यमान शहराध्यक्ष अमीर शेख हे सोलापूर महानगरपालिका निवडणूक लढविणार असल्यामुळे त्यांच्या शिफारशीवरून नजीब शेख यांची राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाच्या शहराध्यक्षपदी मंगळवारी नियुक्ती देण्यात आली.

राष्ट्रवादी भवनात दुपारी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या हस्ते तसेच प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल, मकबूल मोहोळकर, तौफिक शेख, प्रा. श्रीनिवास कोंडी, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत नजीब शेख यांना अल्पसंख्यांक विभागाचे शहराध्यक्षपदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले.

# जिल्ह्यातील प्रकल्पांत सध्या सरासरी ९६ टक्के पाणीसाठा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

यंदा सोलापूर जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या दीडपट पाऊस झाल्याने जिल्ह्यातील प्रकल्पात सरासरी ९६ टक्के पाणीसाठा आहे. याचा फायदा शेतकऱ्यांसह सर्व नागरिकांना उन्हाळ्यात होणार आहे.

लाभक्षेत्र विकास प्राधिकरण कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार उजनी प्रकल्पात आजही ११७ टीएमसी म्हणजेच १०० टक्के पाणीसाठा आहे. तर मध्यम प्रकल्पांमध्ये एकरूख साठवण तलावात आजही १०० टक्के पाणीसाठा आहे. हिंगणी पा. ९५.९३ टक्के, जवळगाव ९१.७५, मांगी ९४.०७, आष्टी ८८.३१, बोरी १००.०२, पिंपळगाव ढाळे ९५.५४ टक्के पाणीसाठा आहे. तर जिल्ह्यात सरासरी ९५.७९ टक्के इतका पाणीसाठा आहे. तर जिल्ह्यातील बहुतांश साठवण तलाव, पाझर तलाव, विहिरी, नाल्यात आजही पाणीसाठा दिसून येत आहे.

या मुबलक पाणीसाठ्यामुळे यंदा उन्हाळ्यात पाणीटँकर कमी लागण्याची शक्यता आहे. याचा फायदा जिल्ह्यातील फळबागा, ऊस आणि उन्हाळी पिकांना होणार आहे. तरीही जिल्ह्यातील नागरिकांनी, शेतकऱ्यांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

## आजतागायत जिल्ह्यात ९२ टक्के रब्बी पेरणी

जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे शेतजमिनींची मशागत करण्यासाठी शेतकऱ्यांना विलंब लागला. पिकांसह शेतजमिनींचे प्रचंड नुकसान झाले. यामुळे गतवर्षीच्या तुलनेत रब्बी हंगामातील पेरणीला यंदा उशिर झाला आणि काही ठिकाणी जमिनीचा वापसाही झाला नव्हता. यामुळे आजतागायत जिल्ह्यात ९२ टक्के पेरणी झाली आहे. अजूनही पेरण्या सुरूच असून, या पिकांची काढणी मात्र पावसाळ्याच्या तोंडावर जाण्याची शक्यता शेतकरी बांधव व्यक्त करीत आहेत.

गतवर्षी रब्बी हंगामात ज्वारी, गहू, हरभरा, मक्याची मोठ्या प्रमाणात पेरणी झाली होती. पोषक वातावरणामुळे चांगले उत्पादन झाले होते. परंतु यंदा पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने दमदार हजेरी लावली. सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांना जमिनींची मशागत करता आली नाही. उडीद, सोयाबीन पिकांचे नुकसान झाले. रब्बी हंगामातील पेरणी करण्यासाठी शेतजमीन मशागतीसाठी उशिरा आल्या. यामुळे ज्वारीपेक्षा गहू, मका, हरभरा याचे क्षेत्र वाढले आहे.



## नामदेवराव भालशंकर गौरव समितीचे पुरस्कार जाहीर

### शनिवारी वितरण; विविध क्षेत्रातील मान्यवरांचा होणार गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

नामदेवरावबापू भालशंकर गौरव समिती सोलापूरच्यावतीने नामदेवराव भालशंकर यांच्या ८७ व्या जयंतीनिमित्त ज्ञानवंत, प्रज्ञावंत, शीलवंत, गुणवंत मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आणि मातोश्री रुक्मिणी फाऊंडेशन सोलापूर या ट्रस्टच्यावतीने स्पर्धा परीक्षा देणारे हुशार, होतकरु आणि गरजू तसेच निराधार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप समारंभ शनिवार,दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता शिवस्मारक सभागृह, नवी पेठ येथे आयोजित करण्यात आलेला आहे, अशी माहिती गौरव समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांनी दिली.

तसेच सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाऊंडेशनच्या वतीने संविधान दिनाचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या संविधान गौरव परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक व सन्मानचिन्ह वितरण करण्यात येणार आहे.

पुरस्कार वितरणाचे हे १२ वे वर्ष आहे. यावर्षीच्या पुरस्कार प्राप्त मान्यवरांमध्ये तथागत भगवान गौतम बुध्द धम्मरत्न पुरस्कारासाठी आनंद जाधव (सरचिटणीस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार संवर्धन समिती अँन्टॉप हिल, मुंबई), डॉ. बाबासाहेब आंबेडकर समतारत्न पुरस्कारासाठी चंदा कासले (लेफ्टनंट जनरल- समता सैनिक दल, मुंबई), राजर्षी शाहू महाराज जीवनगौरव पुरस्कारासाठी दिलीपराव चौगुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन गौरव पुरस्कारासाठी डॉ. सुरेश कोरे, क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले समाजरत्न पुरस्कारासाठी युवराज पवार, राजर्षी शाहू महाराज उद्योगरत्न पुरस्कारासाठी शंकर चौगुले, क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले गुणवंत शिक्षक पुरस्कारासाठी-

लाडजी बागवान, राजर्षी शाहू महाराज गुणवंत कर्मचारी पुरस्कारासाठी मयुर प्रधान, राजर्षी शाहू महाराज गुणवंत कर्मचारी पुरस्कारासाठी मनोहर कुंभार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गुणवंत पत्रकार पुरस्कारासाठी - विश्वभूषण लिमये (उपसंपादक-साम टि. व्ही. मराठी), राहुल भालशंकर, (संपादक तेजस न्यूज महाराष्ट्र), तथागत भगवान गौतम बुध्द विशेष गौरव पुरस्कारासाठी- सम्यक विचार मंच-मिलिंद व्याख्यानमाला, सोलापूर या सत्कारमुर्तींचा सपत्नीक सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, ग्रंथ, शाल, वृक्षाचे रोपटे देवून सत्कार करण्यात येणार आहे. याच समारंभात मातोश्री रुक्मिणी फाऊंडेशन सोलापूर या ट्रस्टच्यावतीने जिल्ह्यातील गरजू विद्यार्थी तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश वितरीत करण्यात येणार आहेत. यावेळी सचिव प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड, रमेश लोखंडे, प्रा. युवराज भोसले, रवी देवकर, उपप्राचार्य प्रकाश शिंदे, निलकंठ शिंगे, मिलिंद भालशंकर, दाऊत आतार, प्रा. डॉ. राजदत्त रासोलगीकर आदी उपस्थित होते.

## जुनी मिल बेकार कामगार, वारसदार जनहित संघर्ष समितीची रविवारी सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

जुनी मिल बेकार कामगार, वारसदार आणि जनहित संघर्ष समितीची रविवार दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता सोलापुरातील रंगभवन चौक येथील समाज कल्याण केंद्र येथे सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे, अशी माहिती सचिव डॉ. संदीप आडके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

१९८८ सालापासून जुनी मिल बेकार कामगार, वारसदार आणि जनहित संघर्ष समिती ट्रस्टमध्ये जुनी मिल जागेची खरेदी घेण्यासाठी सभासदांनी पैसे भरले होते. सोलापुरातील जुनी मिल जागेच्या १२९ एकर जागेसंदर्भात सकारात्मक गोष्टी झाल्या आहेत. १९८८ मध्ये सोलापुरातील जुनी मिलची जागा कोर्टातून लिलावातून घेण्यासाठी तत्कालीन अध्यक्ष कुमार करजगी यांनी अकराशे सभासदाकडून जागेचा मोबदला कोर्टात भरून १९९६ ते ९८ दरम्यान ही जागा संस्थेच्या नावे ताब्यात घेतली होती. सोलापुरातील जुनी मिल कंपाऊंड, मोरारजी पेठ, धरमसी लाईन, जुनी पोलीस लाईन, कंबर तलावाजवळील मोतीबाग अशा पाच ठिकाणी या जागा आहेत. त्यानंतर ट्रस्टची जागा उमा सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करून नोंद करून घेतली होती. दरम्यान, सक्षम संचालक मंडळ नाही, निवडणुका व ऑडिट नसल्याने त्यापैकी काही संस्था अवसायनात काढण्याची कार्यवाही करण्यात आली आहे असा आरोप करत यासह विविध विषयांवर रविवारच्या सभेमध्ये चर्चा होणार आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. दिलीप दामले, केशव जहागीरदार, कल्याण नकाते, चंद्रकांत नकाते आदी उपस्थित होते.

## दाधिच समाजच्यावतीने शनिवारपासून श्रीमद् भागवत कथा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

दाधिच (दायमा) समाज, सोलापूरच्या वतीने द्वारा दि. २० ते २६ डिसेंबर २०२५ रोजी दरम्यान माहेश्वरी सांस्कृतिक भवन, तुळजापूर वेस, सोलापूर येथे श्रीमद् भागवत कथाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष भरत काकडा आणि विठ्ठल दायमा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शनिवार दि. २० डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता शोभायात्रा काढण्यात येणार आहे. दररोज दुपारी २ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत कथा होणार आहे. वरंगल येथील आचार्य पवनकुमार मालोदिया (दाधिच) यांच्या सुमधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथा सादर करणार आहेत.यामध्ये प्रामुख्याने श्री भागवत महात्म्य, भक्ति ज्ञान वैराग्यची स्थापना, गोकर्ण उपाख्यान, कथा सुरुवात, श्री सूत शोनक संवाद, नारद यांचे पूर्व चरित्र, भीष्म स्तुति, परिक्षितांचे जन्म, शुक- परीक्षित भेट, कपिल उपख्यान, सती चरित्र, ध्रुव चरित्र, जह भरत चरित्र, अजामिलोपाख्यान, श्रीनृसिंह अवतार, जेन्द्रमोक्ष, समुद्र मंथन, वामन अवतार ची कथा, श्री राम चरित्र, श्री कृष्ण जन्मोत्सव, नन्दोत्सव, पूतना उद्धार, बाल लीलाएं, गोवर्धन लीला महाराज, कंसाचे उध्दार, उध्दव चरित्र, कृष्ण रुक्मिणी विवाह, द्वारिका तीला, सुदामा चरित्र परीक्षित मोक्ष, श्रीमद् भागवत कथा समाप्ती असे कार्यक्रम होणार आहेत.समस्त भागवत प्रेमींना याचा लाभ घ्यावा असे आवाहन समाजाचे अध्यक्ष भरत काकडा यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस विजय दायमा, श्रीनिवास दायमा, पापा दायमा, पुष्कर व्यास, भगवती व्यास आदी उपस्थित होते.

## सांगोला न.प.च्या विद्युत विभागात सावळा गोंधळ; नागरिक त्रस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१७ डिसेंबर -**

सांगोला नगरपालिकेच्या लाईट (विद्युत) विभागात सध्या सावळा गोंधळ सुरू असल्याचे चित्र आहे. शहरातील रस्ते दिवे वारंवार बंद पडणे, दुरुस्ती कामात दिरंगाई करणे तसेच मोजक्याच ठिकाणी हम करे सो कायदा अशा पद्धतीने कारभार करत लाईटची व्यवस्था करणे यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेक ठिकाणी महिनोन्महिने स्ट्रीट लाईट बंद असल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. वारंवार तक्रारी करूनही त्याची दखल घेतली जात नसल्याने नागरिक हतबल झाले आहेत. कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी लाईट विभागात लक्ष घालावे अशी अपेक्षा सांगोला शहरातील नागरिक व्यक्त करत आहेत.




## हिंगुलांबिका शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

हिंगुलांबिका प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन पार पडला. शाळेतील २०० विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, विठू माऊली, कृष्णा गीत, भूत थीम, झाशीची राणी, चतुर नार, बम बम बोले, मेरे पापा, लल्लाटी भंडार, चिटीया कलाईया,आले मराठे इ.नृत्ये सादर केले. पालकांनी देखील आपल्या मुलांचे नृत्य पाहण्यासाठी गर्दी केली होती. सर्व मुलांचे नृत्य पाहून उपस्थित सर्व मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापू ढगे, सचिव विजय पुकाळे, प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यकीय अधिकारी डॉ. विनायक कुलकर्णी, एसव्हीसीएसचे प्राध्यापक संजय टोंपे, माजी लिपिक सतीश हंचाटे, विद्यानिकेतन हायस्कूलचे मुख्याध्यापक गोपी नवले, सहशिक्षक नितीन मुसळे, श्रीधर महिंद्रकर, संतोष बनसोडे व माजी मुख्याध्यापिका शारदा यादव यांची उपस्थिती होती.

सर्व उपस्थित मान्यवरांचे व नृत्य दिग्दर्शक रेवती क्षीरसागर यांचे हिंगुलांबिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांनी सत्कार करून आभार मानले. सूत्रसंचलन साधना लवटे, शुभांगी पतंगे, पाहुण्यांचा परिचय उषा ननवरे यांनी तर आभार सुमित औसेकर यांनी मानले.

## भारतीय संस्कृतीत दडलाय निरामय आरोग्याचा मूलमंत्र

मार्गशीर्ष महिन्यात सर्वत्र धार्मीक उत्सवांना उधाण आले होते. मल्हारी मार्तंडाच्या चंपाषष्ठीसह गीताजयंती व गुरू दत्तात्रयांचा जन्मोत्सव मोठ्या दिमाखात सर्वत्र साजरा झाला. या महिन्यामध्ये अनेक गावातून नामसप्ताहासह धार्मीक कार्यक्रमांची रेलचेल पहायला मिळाली. सण, समारंभ, उत्सवासाठी होणाऱ्या या गर्दीचे रूपांतर दररोज सर्वांनी किमान एकदा तरी मंदिरात एकत्र जमण्यामध्ये झाले पाहिजे. दररोज ठराविक वेळेला मंदिरात सर्वांनी एकत्र येण्याने भारतीय संस्कृतीच्या संघटनशक्तीचा परिचय देणे सहज शक्य होणार आहे. भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सण समारंभाची रचना त्या त्या ऋतुमानपरत्वे झालेली आहे. मार्गशीर्ष महिन्यात चंपाषष्ठीनिमित्त भरीत-रोडगा (वांग्याचे भरीत व बाजरीची भाकरी) नैवेद्यासाठी निवडला गेला कारण या महिन्यात थंडी असते त्यावर आहाराद्वारे मात करणे शक्य होण्यासाठी ही रचना केलेली असल्याचे दिसते. मार्गशीर्षांच्या शेवटच्या दिवशी वेळामवस्या साजरी केली जाते. यादिवशीचा मेनू सुध्दा ऋतुमानाला पोषक असाच ठरवला गेला आहे. एकंदरीत भारतीय संस्कृतीत त्या त्या सणानिमित्तच्या आहारातून निरामय अरोग्याचा मूलमंत्र सापडतो.

आता पौष महिना सुरू होईल. या महिन्यात सूर्य उपासनेला विशेष महत्व आहे. निरामय अरोग्यासाठी या महिन्यात सूर्य उपासनेद्वारे विशेष साधना केली जाते. सोलापूर शहर जिल्ह्यात पौष महिन्यात धार्मिकतेचा विशेष उत्साह दिसतो. कारण या महिन्यात सोलापूरचे ग्रामदैवत सिध्दरामेश्वराची यात्रा असते. यानिमित्त घरोघरी भोजनावळींचा बेत असतो. त्यामध्ये विशेषत्वाने हुग्गी अर्थात गव्हाची खीर महत्वाची असते. हा आहारही या ऋतुकाळात विशेष लाभदायी असल्याचे दिसून येते. सोलापूर शहरात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या प्रकटदिनानिमित्त अखिल भाविक वारकरी मंडळाच्या पुढाकाराने मोठा दिमाखदार ज्ञानेश्वरी पारायण व हरिनाम सप्ताह सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात ७५० वाचकांनी ज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायण केले. या नामसप्ताहातही दररोज सुमारे तीन ते चार हजार भक्तांना महाप्रसादाचे वाटप झाले. त्यातूनही युक्त आहाराद्वारे श्रवण मननादि भक्तीची पर्वणी लाभली.

पौष महिन्यात रविवारी केल्या जाणाऱ्या सूर्यपूजेचे आध्यात्मिक आणि आरोग्याच्या दृष्टीने मोठे महत्व आहे. हिंदू संस्कृतीमध्ये सूर्याला 'जगताचा आत्मा' आणि 'साक्षात देवता' मानले जाते. वर्षातील बारा महिन्यांपैकी पौष महिना हा विशेषतः सूर्योपासनेसाठी अत्यंत फलदायी मानला जातो. या महिन्यात दर रविवारी केली जाणारी सूर्यपूजा केवळ धार्मिक विधी नसून, ती निसर्ग आणि मानवी शरीर यांच्यातील संतुलनाचा एक मार्ग आहे. पौष महिन्यात सूर्याला 'भग' या नावाने ओळखले जाते. धार्मिक मान्यतेनुसार, या महिन्यात सूर्यपूजन केल्याने मनुष्याला ऐश्वर्य, यश आणि मानसिक शांती प्राप्त होते. पौष हा थंडीचा महिना असतो. निसर्गातील मरगळ झटकण्यासाठी जशी सूर्याच्या ऊर्जेची गरज असते, तशीच मानवी




मनाला चैतन्य मिळवून देण्यासाठी या पूजेचे महत्त्व आहे. अनेक कुटुंबांमध्ये या काळात 'भानू सप्तमी' किंवा रविवारी सूर्याला विशेष नैवेद्य दाखवून व्रत केले जाते. पौष महिन्यात कडाक्याची थंडी असते. या काळात सूर्याची किरणे पृथ्वीवर तिरपी पडत असल्याने ऊर्जेची कमतरता भासते. रविवारी सूर्यपूजा करताना सकाळच्या कोवळ्या उन्हामुळे शरीराला मुबलक व्हिटॅमिन-डी मिळते, जे हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक आहे. सूर्यकिरण त्वचेचे विकार दूर करण्यास आणि शरीरातील जंतूंचा नाश करण्यास मदत करतात. पौष महिन्यात दर रविवारी घरोघरी सकाळी लवकर उठून सूर्यपूजन करण्याची प्रथा आहे. सूर्याला 'अर्घ्य' अर्पण केले जाते. 'ॐ सूर्याय नम:' जप केला जातो. ही पूजा अत्यंत शुभ मानली जाते. या दिवशी अनेक घरांमध्ये खीर किंवा गुळाचा नैवेद्य दाखवला जातो. मिठाचा वापर टाळून केवळ गोड पदार्थांचे सेवन करून व्रत करण्याचीही प्रथा काही ठिकाणी आहे.

अनेकांकडे या पूजेच्या निमित्ताने 'सवाष्ण' किंवा लहान मुलींना घरी बोलावून त्यांना तिळगूळ किंवा खीर-पुरीचे जेवण दिले जाते. हे व्रत आपल्याला निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करायला शिकवते. 'तमसो मा ज्योतिर्गमय' म्हणजेच अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचा संदेश या पूजेतून मिळतो. थोडक्यात सांगायचे तर, पौष महिन्यातील रविवारची सूर्यपूजा ही भक्ती आणि शक्ती यांचा संगम आहे. ती आपल्याला शिस्त, तेज आणि निरामय आरोग्य प्रदान करते. बदलत्या जीवनशैलीत निसर्गाशी नाते जोडण्याचा हा एक उत्तम मार्ग आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### मिती ग्रुपचा 'गगनाला पंख नवे' पुरस्कार मैत्र फौन्डेशनला प्रदान

**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

मिती ग्रुपच्या वतीने देण्यात येणारा 'गगनाला पंख नवे' पुरस्कार करकंब (पंढरपूर) येथे कार्यरत असलेल्या मैत्र फौन्डेशन या संस्थेला प्रदान करण्यात आला. मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण करण्यात आले. संस्थेच्या वतीने विश्वस्त सुजाता आणि अरुण लोहकरे यांनी हा पुरस्कार स्विकारला. दिव्यांग क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती यांना हे पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. पुरस्काराचे यंदाचे अकरावे वर्ष असून यावर्षीपासून मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख स्मृती पुरस्कार सुरु करण्यात आला असून हा पहिला पुरस्कार मैत्र फौन्डेशनला मिळाला आहे. मैत्र फौन्डेशनमार्फत विशेष मुलांच्या पालकांसाठी मर्यादांच्या अंगणात वाढताना हा जाणीवजागृती कार्यक्रम आयोजित केला केला जातो. आत्तापर्यंत पुणे सोलापूर व लातूर जिल्ह्यातील ९ विशेष शाळांमधील सुमारे ७०० पालकांसोबत काम केले आहे. यावेळी बोलताना संस्थेच्या सचिव सुजाता लोहकरे यांनी दिव्यांग व्यक्तींना स्वीकार, प्रेम आणि संधी मिळाल्या तर ते काहीना ना काही काम करीत आनंदाने जगू शकतात. त्यासाठी हा दृष्टीकोन आणि क्षमता राज्यातील पालकांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे असे सांगितले. सध्या या केंद्रात ११ मतिमंद व्यक्तींना नॅपकीनचे बुके, सोलापुरी चादरीच्या पिशव्या, शबनम बॅग्स, पर्सेस, डस्टर अशा वस्तू बनवायला शिकल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.



### माळीनगर येथे ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमाचे आयोजन

**माळीनगर, दि. १७ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील माळीनगर येथे शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संस्थेच्या महात्मा फुले कृषी महाविद्यालय अकलूज अंतर्गत माळीनगर ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा पार पडला. चतुर्थ वर्षात शिक्षण घेत असणाऱ्या कृषीकन्या यांनी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली महाविद्यालयाच्या वतीने येथे कृषी कार्यानुभव कार्यक्रम पुढील सहा महिने राबविण्यात येत आहे.त्या अंतर्गत कृषी दुतांनी गावातील शेतकरी बांधवांना शेतीमधील नवीन माहिती देण्यात येईल असे सांगितले आणि शेतकरी बांधवांना पारंपारिक व आधुनिक शेती बद्दल असणारा फरक तसेच नवनवीन तंत्रज्ञानाबद्दल माहिती दिली. यावेळी माळीनगर ग्रामपंचायत सरपंच अनुपमा एकतपुरे, गटविकास अधिकारी कैलास सुरवसे, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमात कृषिकन्या रसिका बनसोडे, वैभवी देवकर, मानसी रक्ताटे,नेहा निकम,तनवी साडेकर,भाग्यश्री निलोगी, प्रणाली पोमण,सिद्धी लोंढे यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमास रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य अर्जुन नलावडे, कार्यक्रम समन्वयक एस.एम.एकतपुरे, कार्यक्रमाधिकारी एम.एम.चंदनकर, एच.डी. कल्याणी यांचे मार्गदर्शन लाभले.



### आदर्श स्कूलचे होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत यश

**कुर्डूवाडी, दि. १७ डिसेंबर-**

कुर्डुवाडी येथील आदर्श पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जीबीएसटीए तर्फे घेण्यात आलेल्या होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा २०२५ मध्ये यश संपादन करून शाळेचा लौकिक उंचावला आहे. परीक्षेत शाळेतील १५ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणांसह यश मिळवले आहे. विशेष म्हणजे, आदर्श पब्लिक स्कूलचा हा या प्रतिष्ठित परीक्षेतील पहिलाच सहभाग असून, पहिल्याच प्रयत्नात विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यशाची नोंद केली आहे. सहावीतील यशस्वी विद्यार्थी : अश्लेषा भोरे, श्रुती जगताप, अदिती माळी, गौरी भोंग, काव्या देशमुख, राजवीर घाळके, राजवीर गाडेकर, शिवदत्त चव्हाण, सविधान बाविस्कर. नववीतील यशस्वी विद्यार्थी : स्वराज बाविस्कर, अदिती शिंदे, हर्षदा कुणाले, ऋषिराज इंगळे, पृथ्वी शिंदे, श्रेयश ढवळे. या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, पालकांचे सहकार्य तसेच विज्ञान शिक्षिका मेहराज सय्यद यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी संस्थेच्या प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, मुख्याध्यापिका भारती मेहता यांनी अभिनंदन केले.

### शुक्रवारी मोफत रोगनिदान शिबीर

**पिलीव, दि. १७ डिसेंबर-**

राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रम जिल्ह्य रूगणालय सोलापूर व आदित्य बिर्ला मेमोरियल हॉसपीटल व आखिल भारत महीला सेवा समाज यांच्या संयुक्त विद्यमाने १९ डिसेंबर रोजी जिल्ह्य रुग्णालय सोलापूर याठिकाणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात फाटलेले ओठ व फाटलेला टाळा तसेच चेहऱ्याच्या जन्मजात व्यंगासाठी मोफत रोगनिदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबीरात अश्या सर्व रुग्णांची तपासणी आदित्य बिर्ला मेमोरियल हॉसपीटलच्या तज्ज्ञ टीमकडून केली जाणार आहे. तर बिर्ला मेमोरियल हॉसपीटल पुणे याठिकाणी मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

# रस्त्यांच्या दुरवस्थेविरोधात आरपीआयचा पवित्रा

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १७ डिसेंबर-**

माळिशरस तालुक्यातील अकलूज-वेळापूर परिसरासह विविध अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय व जीवघेणी झाली असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), माळिशरस तालुका यांच्यावतीने सार्वजनिक बांधकाम विभागाला इशारा व अंतिम निवेदन तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले आहे.

अकलूज-वेळापूर हा अवघा ११ कि.मी.चा महत्त्वाचा मार्ग असून तो संत ज्ञानेश्वर पालखी महामार्गासह सांगोला-जत महामार्गाला जोडणारा आहे. मात्र हा मार्ग पूर्णतः उखडलेला, खड्डेमय व अपघातांना आमंत्रण देणारा ठरला आहे.

तसेच वेळापूर-निमगाव, अशोका चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, वेळापूर-धानोरे,



वेळापूर-उघडेवाडी-माळखांबी, म्हेत्रे मळा-पिसेवाडी, निमगाव पाटी ते यशवंतनगर, विझोरी शिवामृत ते उदयनगर असे अनेक रस्ते अत्यंत दुरावस्थेत आहेत. यापूर्वी निवेदन देऊनही केवळ तात्पुरते खड्डे बुजवून प्रशासनाने वेळकाढूपणा केल्याचा आरोप आरपीआयने केला आहे. त्यामुळे आता कायमस्वरूपी व दर्जेदार दुरुस्तीशिवाय माघार नाही, असा ठाम इशारा देण्यात आला आहे.

आंदोलनातून उद्भवणाऱ्या कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान रिपाइंचे निवेदन कार्यकारी अभियंता सुनीता पाटील यांनी स्वीकारले. यावेळी युवक आघाडी राज्य उपाध्यक्ष किरण धाईजे, जिल्हा सचिव रमेश धाईजे, जि. उपाध्यक्ष नितीन मोरे, अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे, तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे, युवक सरचिटणीस प्रवीण साळवे,माळी नगर अध्यक्ष प्रकाश कांबळे, वेळापूर युवक अध्यक्ष स्वप्निल सरवदे, दीपक दळवी, पत्रकार गौतम भंडारे, होलार समाज संघटनेचे अध्यक्ष दादासाहेब नामदास, सागर देशमुख उपस्थित होते.

## २४ डिसेंबरला अकलूज-वेळापूर रस्त्यावर रस्तारोको आंदोलनाचा इशारा

### खड्ड्यांमध्ये करणार प्रतिकात्मक वृक्षारोपण

जर तात्काळ प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली नाही, तर दिनांक २४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता अकलूज-वेळापूर रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात खड्डयांमध्ये प्रतिकात्मक वृक्षारोपण करून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणाचा जाहीर निषेध करण्यात येणार आहे.

## एस.टी. कंडक्टर मारहाणप्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ डिसेंबर-**

एस. टी. कंडक्टर यांना मारहाण करुन सरकारी कामात अडथळा केलेप्रकरणाच्या खटल्यात संजय दगडू पवार (वय २६ वर्षे, रा. मौजे चौबे पिंपरी ता.माढा) याची बार्शी येथील सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

याची थोडक्यात हकीकत अशी की, दि. ४ डिसेंबर २०१० रोजी फिर्यादी कंडक्टर म्हणून ड्युटीवरुन कुर्डुवाडी ते वरवडे जात असताना एस.टी. बसमधील महिला लक्ष्मी पवार यांनी प्रवासीने ज्येष्ठ नागरिक असल्याचे कार्ड दाखवून अर्ध्या तिकीटाची मागणी कंडक्टरकढे केली असता, त्यावेळेस फिर्यादी कंडक्टरने अर्धे तिकीट देता येत नाही, असे सांगितले. त्यावेळेस आरोपी व फिर्यादीमध्ये वाद झाला. एस.टी. मौजे चौबे पिंपरी येथील स्टॅन्डवर आली असताना, आरोपीही खाली उतरले आणि जाताना तुला बघू असे म्हणून फिर्यादीचे केस ओढले. तदनंतर परत त्याच मार्गे एस. टी. जात असताना, संध्याकाळी ४ वाजता आरोपी हे चौबे पिंपरी या स्टॉपवरुन गाडीमध्ये चढून सदर महिला लक्ष्मी पवार व तिचा मुलगा संजय पवार यांनी फिर्यादीस हाताने मारहाण केली. अन्य प्रवासानी मध्यस्थी केलेमुळे आरोपी हे बसमधून उतरुन गेले. तदनंतर फिर्यादीने बस कुर्डुवाडी पोलीस स्टेशन येथे नेऊन आरोपी विरुद्ध सरकारी कामात अडथळा निर्माण करुन मारहाण केले प्रकरणी सदर महिला लक्ष्मी पवार व तिचा मुलगा संजय पवार यांचे विरुध्द कुर्डुवाडी पोलीस स्टेशन येथे भा. दं. वि. कलम ३५३, ३३३, ३३२, ३२४, ३२३, ५०४,आणि ३४ अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणी पोलिसांनी तपास करुन आरोपी विरुध्द न्यायालयामध्ये दोषारोप पत्र पाठविले होते. खटला सुरु असताना आरोपी लक्ष्मी पवार यांचे निधन झाले. तिचा मुलगा संजय पवार यांचे एकटे विरुद्ध खटला चालला. सदर प्रकरणाची सुनावणी अति. सत्र .न्यायाधिश व्ही. एस मालकल्पट्टे रेड्डी यांचे समोर झाली. सदर प्रकरणी सरकारी वकील यांनी एकूण ६ साक्षीदार तपासले व आरोपीच्या शिक्षेची मागणी केली. या उलट आरोपीच्या वकिलांनी ऍड. शशि कुलकर्णी, ऍड. मिलिंद खुपसूरे, यांनी साक्षीदाराच्या जबाबातील विसंगती मे. कोर्टाच्या निदर्शनास आणून देऊन, सरकार पक्षाने एकही नेत्र साक्षीदार तपासाला नसल्याचे सांगून अनुषंगाने प्रभावी युक्तीवाद केला. सदरचा युक्तीवाद ग्राहय धरुन कोर्टाने आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.

सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. शशि कुलकर्णी, ॲड. मिलिंद खुपसूरे, ॲड. देवदत्त बोरगावकर, ॲड. प्रसाद अग्निहोत्री व सरकारतर्फे ॲड. होटकर, ॲड. डी.डी. देशमुख यांनी काम पाहिले.

## ग्रंथपाल आसिफ आतार यांच्या 'अध्याय' पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ डिसेंबर-**

सोजर कॉलेज ऑफ फार्मसी येथे ग्रंथपाल म्हणून कार्यरत असलेले आसिफ चांदसाहेब आतार यांचा ज्ञानाचे जतन : ग्रंथालयामध्ये डिजिटल संग्रहण या पुस्तकामधील अध्याय यशस्वीरीत्या प्रकाशित झाला आहे. हे पुस्तक अध्याय लिहिताना डॉ. राहुल कल्याणराव देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवार, दि. १६ डिसेंबर रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजित करपे यांच्या हस्ते संपन्न झाले.

प्रकाशित पुस्तक अध्यायचा विषय विद्यार्थ्यांसाठी आणि संशोधनासाठी डिजिटल संग्रहणाचे महत्त्व असा असून, आधुनिक काळातील ग्रंथालयांची भूमिका, डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे ज्ञानाचे जतन, माहितीचा सुलभ व वेगवान वापर तसेच संशोधन प्रक्रियेला होणारा लाभ यावर सखोल मांडणी करण्यात आली आहे.



आजच्या डिजिटल युगात विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षकांसाठी डिजिटल संग्रहण कसे उपयुक्त ठरते, याचे स्पष्ट विवेचन या लेखात करण्यात आले आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे संस्थापक अरुण बारबोले व सचिवा कल्पना बारबोले यांनी आतार यांचे कौतुक केले. तसेच प्राचार्य डॉ. सुजित करपे यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## एटीएएल-एआयसीटीई प्रायोजित एफडीपीचे उद्घाटन

### सहा दिवस चालणाऱ्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग केगाव-सोलापूर येथील विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या वतीने एटीएएल-एआयसीटीई प्रायोजित ऑफलाईन फॅकल्टी डेव्हलपमेंट सहा दिवसीय प्रोग्राम आयोजित केला आहे. याचे उद्घाटन सोमवारी पार पडले. या सहा दिवस चालणाऱ्या एफडीपीचे उद्घाटन राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, गोवा येथील नामांकित तज्ज्ञ व संसाधन व्यक्ती डॉ. सुरेश मिक्किली यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शंकर नवले उपस्थित होते.

भविष्यातील गतिशीलतेसाठी अभियांत्रिकी ५.० या अत्यंत समर्पक व काळाची गरज ओळखून निवडलेल्या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या या एफडीपीमध्ये महाराष्ट्रासह हैदराबाद येथील



विविध नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील प्राध्यापक, संशोधन अभ्यासक व तज्ज्ञांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला आहे. सुमारे ५५ सहभागी या कार्यक्रमामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेत असून आधुनिक तंत्रज्ञानाविषयी अद्ययावत ज्ञान आत्मसात करीत आहेत.

या सहा दिवसीय एफडीपी दरम्यान विविध नामांकित संसाधन व्यक्तींचे मार्गदर्शन लाभणार आहे. १५ डिसेंबर रोजी फ्युजनलीप कन्सल्टन्सी अँड सर्व्हिसेस (सल्लागार व सेवा संस्था), मिरज येथील श्री. अनुप सी. जोशी यांनी मार्गदर्शन केले. १६ डिसेंबर रोजी सुनंद टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, पुणे येथील रोहन दोशी तसेच वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली येथील डॉ. सुशील कर्वेकर यांचे तांत्रिक व्याख्यान होणार आहे. दि. १७ डिसेंबर रोजी VJTI, मुंबई येथील डॉ. नितेशकुमार अग्रवाल आणि डॉ. गजानन एम. गलशेटवार हे सहभागी प्राध्यापकांना मार्गदर्शन करणार आहेत. या एफडीपीचे यशस्वी आयोजन डॉ. विजयकुमार बिरादर (समन्वयक, एटीएएल एफडीपी) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून प्रा. माणिक शिंदे यांनी कार्यक्रमाच्या नियोजन व अंमलबजावणीसाठी सहकार्य केले.



## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात केएसएम महाविद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. १७ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात नागनळ्ळी येथील केएसएम कनिष्ठ महाविद्यालयाचे माध्यमिक गटातून तालुक्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाले असून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

अक्कलकोट पंचायत समिती शिक्षण विभाग व ग्रामीण विद्या विकास विद्यालय चपळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ५३ वे अक्कलकोट तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन चपळगाव येथे १५ व १६ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले होते. तालुक्यातून माध्यमिक गटातून १०८ वैज्ञानिक उपकरणांची मांडणी या प्रदर्शनात केली होती. केएसएम कनिष्ठ महाविद्यालय नागनळी येथील विद्यार्थी महेश टेंगळे, हरळय्या यशवंत, फडतरे ओंकार या विद्यार्थ्यांनी स्मार्ट ग्रीकल्चरल, कॅटल फार्म व बहुउपयोगी शेतीयंत्र या उपकरणाची निर्मिती केली आहे. या वैज्ञानिक उपकरणास माध्यमिक गटातून तालुक्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाले असून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

या विद्यार्थ्यांना प्राध्यापक रवींद्र नवले, अमोल पाटील, वशिम शेख, शुभांगी मिठारे व प्रयोगशाळा सहाय्यक शेख नूरुद्दीन यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे सचिव जावेद पटेल, प्राचार्य मुजावर आय.एम., मुख्याध्यापक शेख आर.जी. व प्रशालेतील शिक्षकांनी अभिनंदन केले.

# निर्माल्याचा पुनर्वापर हीच खरी ईश्वरभक्ती

### शुभांगी बुवा यांचे प्रतिपादन

### 'निर्माल्य सुगंध' कार्यशाळेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

देवाला अर्पण केलेली फुले दुसऱ्या दिवशी सुकल्यानंतर त्यांना पाण्यात न विसर्जित करता, त्यापासून सुगंधी उदबत्ती तयार करणे ही देवाची खरी सेवा आणि अलौकिक भक्ती आहे, असे प्रतिपादन पाखर संकुल संस्थेच्या संस्थापिका ज्येष्ठ कीर्तनकार शुभांगी बुवा यांनी केले.

'निर्माल्य सुगंध' या आगळ्यावेगळ्या कार्यशाळेचा सोलापुरात शुभारंभ झाला. इंटॅक सोलापूर चॅप्टर, इंटॅक नवी दिल्ली येथील एच.सी.सी.डी. विभाग आणि रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या चार दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.



श्री सरस्वती शिक्षण संस्था संचलित स.ही.ने प्रशाला येथे आयोजित या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे DGE-RD ३१३२ जयेश पटेल होते. प्रमुख पाहुण्या म्हणून पाखर संकुल संस्थेच्या संस्थापिका ज्येष्ठ कीर्तनकार शुभांगी बुवा आणि एमआयटी स्कूल ऑफ डिझाईनच्या अधिष्ठाता प्रा. रुपाली धामणे यांची उपस्थिती होती. तसेच नवी दिल्ली येथील तज्ज्ञ प्रशिक्षक प्रवीण तिवारी, अनुष्का रावत, इंटॅक सोलापूरचे समन्वयक प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर, सहसमन्वयक आर्कि. श्वेता कोठावळे, रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा डॉ. धनश्री केळकर, सचिव दिनेश फोफलिया आणि सहसमन्वयिका आर्कि. पुष्पांजली काटीकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्रा.डॉ. नरेंद्र काटीकर यांनी केले. कार्यशाळेत सोलापूर जिल्हभरातून सुमारे ८५ महिला, युवक आणि युवती सहभागी झाले आहेत. चार दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षणात हस्तकलेच्या माध्यमातून उदबत्ती निर्मिती, कच्च्या मालाचे व्यवस्थापन आणि विक्री तंत्र यावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. कार्यक्रमाचे औचित्य साधून श्री सरस्वती शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा रेवती कुलकर्णी व मुख्याध्यापिका नीता येरमाळकर यांनी शुभेच्छा दिल्या आणि संस्थेचे पूर्ण सहकार्य राहील असे आश्वस्त केले. सूत्रसंचालन प्रा. भीमगोंडा पाटील यांनी केले, तर रोटरी क्लबच्या अध्यक्षा डॉ. धनश्री केळकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शशिकांत पाटील, शुभम वर्मा, आदित्य बांगर, समृद्ध बगले, अमित वर्मा, शुभम कोरे, गोवर्धन चाटला, अच्युत काटीकर, प्रत्युष काटीकर, बसवराज सावळगी यांच्यासह संयोजन समितीने परिश्रम घेतले. ही कार्यशाळा शनिवार, दि. २० डिसेंबर पर्यंत सुरू राहणार असून समारोपाच्या सत्रात प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वाटप केले जाणार आहे.

### शासकीय धान्य गोदाम परिसरात २१ डिसेंबरला प्रतिबंध आदेश जारी

**पंढरपूर, दि.१७ डिसेंबर -**

पंढरपूर नगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्याक्रमानुसार २१ डिसेंबर रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. मतमोजणी प्रक्रीया शासकीय धान्य गोदामात पार पाडली जाणार आहेत. भारतीस नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे दि.२१ डिसेंबर रोजी सकाळी ६ ते मतमोजणी प्रक्रिया पार पडेपर्यंत प्रतिबंधात्क आदेश जारी केले आहेत.

दि.२१ डिसेंबर रोजी सकाळी ६ ते मतम ोजणी प्रक्रिया पार पडेपर्यंत पंढरपूर येथील कराड नाका ते उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय कॉर्नर, मागील बाजूस मार्केट गेट समोरील रस्त्यावर साबळे ऑटोमोबाईल्स ते शिवशंकर बंगला उजवी बाजू, व्हीआयपी रोड तसेच बेद्रेकर एस टी डी रस्ता ते भीम रत्न वार्ताफलक कसबे सदन शासकीय धान्य गोदाम, पंढरपूर येथील परीसरात तसेच गोदाम ाभोवतीच्या सर्व रस्त्यावर निवडणूक काम ाव्यतिरिक्त अनावश्यकपणे थांबणे, वाहतूकीस अडथळा निर्माण करणे अथवा कामकाजापासून परावृत्त करणेचा प्रयत्न करण्यास यास प्रतिबंध करण्यात येत आहे. सदरचा मार्ग केवळ पादचारी मार्ग म्हणून घोषित करण्यात आला आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टला स्वामींचे आशिर्वाद लाभावेत

### अध्यक्ष संजीव जावळे : मंदिर समितीतर्फे केला सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि १७ डिसेंबर**

पुण्यातील ऐतिहासिक श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टच्या वतीने नुकतेच सुरूवात करण्यात आलेल्या मोफत शैक्षणिक व वैद्यकीय उपक्रमांना श्री स्वामींचे आशिर्वाद लाभावे असे मनोगत श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टचे अध्यक्ष संजीव जावळे यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानला सपत्निक भेट देवून श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी जावळे व त्यांच्या पत्नी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, देवून यथोचित सन्मान केला. यावेळी संजीव जावळे बोलत होते. यावेळी प्रथमेश इंगळे मंदिर समितीचे विश्वस्त महेश गोगी, व्यंकटेश पुजारी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, विपुल जाधव, डॉ. हिरण्णा पाटील, संतोष वराळे, प्रसाद सोनार, स्वामीनाथ लोणारी, इत्यादी उपस्थित होते.





## महत्त्वाचे



### 'एकता महिला मंच'च्यावतीने आयपीएस अंजना कृष्णा यांचा विशेष सन्मान

**करमाळा, दि.१७ डिसेबर-**

महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या 'एकता महिला मंच'च्या वतीने करमाळा विभागाच्या पोलीस उपविभागीय अधिकारी अंजना कृष्णा यांचा त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, आगामी 'आदर्श महिला शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा' व मार्गदर्शन मेळाव्यासाठी त्यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले. सोलापूर जिल्ह्यात अंजना कृष्णा यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन एकता महिला मंचच्या वतीने दि.१८ डिसेंबर रोजी डीवायएसपी कार्यालयात त्यांचा यथोचित सन्मान केला. यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान, अंजना कृष्णा यांनी एकता महिला मंचच्या कार्याचे कौतुक केले. येणाऱ्या काळामध्ये संस्थेच्या सदस्यांना तसेच एमपीएससी व स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या मुलींना स्वतः मार्गदर्शन करणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. यावेळी एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर, तालुका कोषाध्यक्ष रेश्मा मुक्ते, तालुका प्रसिद्धीप्रमुख गीतांजली जोशी, तालुका संघटन सचिव लक्ष्मी सुतार तालुका पदाधिकारी रुक्मिणी पायगन, सुरेखा कोळी उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ आणि निमंत्रण पत्रिका देऊन अंजना कृष्णा यांना कार्यक्रमासाठी आग्रहाचे निमंत्रण दिले. एकता महिला मंचच्या वतीने आयोजित केला जाणारा शिक्षक पुरस्कार सोहळा महिला शिक्षकांच्या सन्मानासाठी आणि सामाजिक चळवळीला गती देण्यासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

**'आदर्श महिला शिक्षक' पुरस्कारासाठी निमंत्रण**



### माळिशरस पं.स.समोरील आजीचे आमरण उपोषण अखेर स्थगित; प्रशासनाचे आश्वासन

**माळिशरस, दि.१७ डिसेंबर-**

पुरंदावडे (ता.माळिशरस) येथील राहत्या घराशेजारी अतिक्रमण करून रस्ता अडवणूक केल्याने ५० वर्षीय आजीने एक वर्षाच्या नातवासह मुले व सुना समवेत माळिशरस पंचायत समिति कार्यालयासमोर सुरू केलेले आमरण उपोषण गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांनी दिलेल्या लवकरच ग्रामपंचायत मासिक मीटिंगमध्ये विषय घेऊन सदरचे बेकायदेशीर शेड काढले जाईल असे आश्वासन दिल्याने स्थिगत करण्यात आले.

पुरंदावडे ग्रामपंचायत गावठाण हद्दीतील शेजारील साधू पालवे हे राहत्या घराच्या पुढील बाजूस येण्या-जाण्याच्या रस्त्यावरच जनावरे बांधत आहेत. जाणे येण्यास अडवणूक केली जात आहे. याबाबत पुरंदावडे ग्रामपंचायत येथे तक्रार केली असता प्रशासन कोणत्याही प्रकारची कार्यवाही करीत नाहीत. आम्हाला न्याय कोणत्याही प्रकारचा मिळत नाही उलट साधू पालवे हे आमच्यावर खोट्या केसेस दाखल करतात त्यांना माजी सरपंच व विद्यमान उपसरपंच देविदास ढोपे हे साधू पालवे यांना पाठीशी घालण्याचे काम करीत आहेत. आमच्यावर अन्याय करीत आहेत तरी आम्हाला आमच्या राहत्या घराकडे जाणारा रस्ता अतिक्रमण काढून शासकीय नियमाप्रमाणे मोजमाप करून खुला करावा यासाठी छाया पालवे, शंकर पालवे, गणेश पालवे, सुप्रिया पालवे, अनिता पालवे यांच्यासह लहान मुले व मुली आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांच्या समवेत विघ्नेश पालवे एक वर्षाचा लहान मुलगाही उपोषण स्थळी होता.

## लाडक्या बहिणींनो, शहर विकासासाठी महायुतीलाच विजयी करा

### भाजपा महिला प्रदेशाध्यक्षा आ. चित्रा वाघ : मंगळवेढ्यात घेतला महिला संवाद मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १७ डिसेंबर-**

राज्यातील भगिनींना लाडकी बहिण योजनेतून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने केले. मंगळवेढा नगरीमध्येही अशा योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीच्या उमदेवारांना निवडून द्यावे लागणार आहे. नगराध्यक्षपदाच्या अधिकृत उमेदवार प्रा.सुजाता उर्फ सुप्रिया जगताप यांच्यासह सर्व अधिकृत उमेदवारांना मोठ्या फरकाने विजयी करा असे आवाहन भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष व आमदार चित्रा वाघ यांनी केले.



मंगळवेढा नगरपरिषद निवडणूकीच्या अनुषंगाने महायुतीतील उमेदवारांच्या प्रचारार्थ येथे महिला संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. जोगेश्वरी मंगल कार्यालयतील या मेळाव्यात त्या बोलत होत्या. यावेळी आमदार समाधान आवताडे, अखिल भारतीय वारकरी मंडळ महिला आघाडी जिल्हाध्यक्षा पार्वतीताई आवताडे, ज्येष्ठ मार्गदर्शक विष्णुपंत आवताडे, महिला नेत्या अंजली आवताडे, ज्येष्ठ नेते रामचंद्र जगताप, माजी उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर भगरे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अजित जगताप, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष औदुंबर वाडदेकर आदींसह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला बहुसंख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, केंद्र राज्य सरकारच्या वतीने देशातील महिला भगिनींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक योजना सार्वजनिक जीवनामध्ये अतिशय लोककल्याणकारी उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून राबवल्या जात आहेत. विकासाचे हेच व्हिजन डोळ्यासमोर ठेवून आपल्या नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रा.सुजाता उर्फ सुप्रिया जगताप तसेच सर्व नगरसेवक पदांचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामुळे आपण आपले अनमोल मत महायुती उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे ठेवून त्यांना भरघोस मतांनी निवडून द्यावे. यावेळी महिलांशी थेट संवाद साधत शहराच्या विकासात महिलांची भूमिका, सक्षम नेतृत्व, सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य आणि स्वयंरोजगार यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या मेळाव्यास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. त्यांचा आत्मविश्वास आणि परिवर्तनासाठीची सकारात्मक भूमिका पाहता महायुतीच्या उमेदवारांना भक्कम पाठिंबा मिळेल, असा विश्वास या मेळाव्यातून व्यक्त झाला. महिलांच्या सहभागातून मंगळवेढ्याच्या विकासाला नवी दिशा देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

संवाद मेळाव्यात आपले भाषणाला प्रारंभ करताना आमदार चित्रा वाघ म्हणाल्या की, समाधान दादांचा पायगुण महायुती सरकारसाठी अतिशय चांगला ठरला आहे. त्यामुळे महायुती सरकारमधील एकही पदाधिकारी व कार्यकर्ता यांना समाधान दादांचा विसर कधीही पडणार नाही असे त्यांनी सांगताच उपस्थित महिला भगिनींनी समाधान दादा तुम आगे बढो अशा घोषणांनी वातावरण दणाणून सोडत टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला.

## अक्कलकोट विधानसभा क्षेत्रात मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालयासाठी २ कोटी १५ लाख मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१७ डिसेंबर-**

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील दहा गावांत मंडळ अधिकारी आणि तलाठी कार्यालये बांधण्यासाठी एकूण दोन कोटी १५ लाख रुपये मंजूर झाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.



महसुली व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालयांच्या बांधकामांना शासनाकडून प्राधान्य दिले जात आहे. त्यासाठी दोन कोटी १५ लाख रुपयांचा निधी जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर करण्यात आला. यामध्ये मंडल कार्यलयांसाठी प्रत्येकी २५ लाख रूपये तर तलाठी कार्यालयांसाठी प्रत्येकी १८ लाख लाख देण्यात येणार आहेत.

या निधीमुळे तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांसाठी आधुनिक कार्यालये आणि इतर पायाभूत सुविधा निर्माण होणार आहेत, ज्यामुळे महसुली कामांना गती मिळेल असा विश्वास आहे. या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे सहकार्य लाभले आहे.

**- सचिन कल्याणशेट्टी, आमदार, अक्कलकोट**

किणी, वागदरी, वळसंग, मैंदर्गी आणि मुस्ती या पाच गावांत प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी मंडळ अधिकारी कार्यालयांसाठी मंजूर करण्यात आला आहे. तर धोत्री, हालहळी (अ),कडबगाव, मुस्ती आणि खैराट या पाच गावांतील तलाठी कार्यालय बांधकामासाठी प्रत्येकी १८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

## 'त्या' कारखान्याने किती दर जाहीर केला ते पाहून आम्ही दर ठरवू!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ डिसेंबर-**

जिल्हाधिकाऱ्यांनी गत महिन्यात साखर कारखाना प्रतिनिधींच्या २ बैठका घेतल्यानंतर ३० नोव्हेंबरला उसाचे दर जाहीर करणार असा शब्द त्या साखर कारखानदारांनी दिला होता. मात्र अमूक कारखाना किती दर जाहीर करतो...तमूक किती देतो... आणि त्यांचे पाहून आम्ही दर जाहीर करू... असे म्हणण्यात अजूनही काही कारखान्यांनी दर जाहीर केला नसल्याची खंत शेतकरी संघटना पदाधिकारी आणि जिल्हा प्रशासनाकडून व्यक्त होत आहे.

जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरीबांधव आणि साखर कारखानदारांत समन्वयाचे वातावरण असावे, शेतकऱ्यांच्या कष्टाच्या उत्पन्नाला चांगला दर मिळावा यासाठीच जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी साखर कारखानदार प्रतिनिधींची नोव्हेंबरमध्ये २ बैठका घेतल्या मात्र काही साखर कारखान्यांकडून अजूनही दर जाहीर केला नसल्याने त्यांनी त्या कारखानदारांची गंभीर दखल घेतली आहे. इतकेच नाहीतर जिल्ह्यातील जनहित शेतकरी संघटना, स्वाभिमानी शेतकरी संघटना, रयत, क्रांती शेतकरी संघटनांसह इतरही काही शेतकरी नेते गेल्या १५ दिवसांपासून चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. या सर्वांच्या भीतीपोटी साखर कारखाना प्रशासनाकडून दरही जाहीर होत आहेत. यामुळे तीन हजार व त्यापेक्षा अधिक रकमेची पहिली उचल जाहीर करणाऱ्या साखर कारखान्यांची संख्या तब्बल १७ ते १८ वर पोहोचली असून, अठ्ठावीसशे व त्यापेक्षा अधिक पहिली उचल सहा कारखान्यांनी जाहीर केली आहे.



ऊस दराच्या प्रश्नांवर जिल्ह्यात सर्वच शेतकरी संघटना एकत्र आल्या असून, लोकमंगल साखर कारखान्यांवर दोन दिवसांपासून प्रमुख नेते ठाण मांडून बसले आहेत. सोलापूर जिल्ह्यात यंदा सर्वाधिक ३६ साखर कारखाने ऊस गाळप घेत आहेत. जवळपास ३५ साखर कारखाने सुरू झाले आहेत. एकीकडे शेतकरी संघटनांचा दरासाठी रेटा, तर काहींनी तीन हजारांवर दर दिल्याने एकापाठोपाठ एक अशा १७ ते १८ साखर कारखान्यांनी पहिली उचल तीन हजार व त्यापेक्षा जाहीर केली आहे. पाच-सहा कारखान्यांनी २८०० रुपयांपेक्षा अधिक पहिली उचल जाहीर केली आहे. यातील काही साखर कारखान्यांनी गाळप हंगामाला दीड महिना झाला तरी दर जाहीर केला नाही व ऊस उत्पादकांचे पैसेही दिले नाहीत. यामुळे शेतकरी संघटना त्या विरोधात अजूनही लढतच आहेत.

## पंढरपूर नगरपरिषद प्रभाग क्रमांक ७ ब साठी २० डिसेंबरला मतदान

### ५ उमेदवारासाठी ६ मतदान केंद्रे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ डिसेंबर -**

पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक ७ ब मध्ये राज्य निवडणूक आयोगाकडून सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या प्रभागात पाच उमेदवार नगरसेवक पदासाठी निवडणूक लढवीत असून, या प्रभागातील सहा मतदान केंद्रावर मतदान होणार असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

या मतदानासाठी ईव्हीएम मतदान यंत्र सील करण्याची प्रक्रिया १९ डिसेंबर २०२५ रोजी पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्यात येणार आहे.या प्रभागासाठी नियुक्त निवडणूक अधिकारी व कर्मचारी यांना आवश्यक निवडणूक प्रशिक्षण देण्यात आले आहे. सहा मतदान केंद्रावर प्रत्येकी एक याप्रमाणे सहा ईव्हीएम मशीन उपलब्ध राहणार आहे. तसेच चार राखीव मतदान यंत्राची तरतूद करण्यात आली आहे.

प्रभाग क्रमांक सात ब येथील मतदारांना दिनांक २० डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते ५.३० या वेळेत मतदान करता येणार आहे. ७ ब प्रभागातील मतदान शांततापूर्ण व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी नगरपालिका प्रशासनाची यंत्रणा सज्ज असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

## बार्शी शहर रिक्षा सेनेच्या पदाधिकाऱ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि १७ डिसेंबर-**

बार्शी शहर रिक्षा सेनेची नवीन पदाधिकाऱ्याची निवड शिवसेना नेते भाऊसाहेब आंधळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. रिक्षा सेना शहर प्रमुख ज्ञानेश्वर उर्फ बप्पा लावंड, उपशहर प्रमुख उमेश उर्फ बबलू शेट्टी, सचिव दगडू चव्हाण, खजिनदार योगेश डोंबे व संघटकपदी बापू तेलंग यांना कायम ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमाप्रसंगी आप्पा साळुंखे, बशीर सय्यद, श्रीकांत बिडवे, आकाश लोखंडे, मुन्ना नवगण, अनिल तांबे, अशोक विधाते, बाबा दगडे, सलमान मुलाणी, किरण वायकर, बापू मोरे, सौदा जगताप, पांडू समिंद्रे, अक्षय भालेराव हे सर्व रिक्षा चालक-मालक मोठ्या संख्येने या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित होते.



## विष्णूपद मंदिराच्या छतावर विस्तारतेय भांडीक किंवा देवकिन्हई पक्ष्यांची वस्ती

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि.१७ डिसेंबर -**

अरे खोप्या मंदी खोपा सुगरणीचा चांगला, देख पिल्लांसाठी तिनं जीव झाडाले टांगला या बहिणाबाईच्या कवितेतील चिमणी आपले घरटे झाडांवर तयार करते. मात्र येथील विष्णूपद मंदिराच्या छताच्या बाजूस असलेली देवकिन्हई पक्ष्यांची घरटी प्रत्येकांचे लक्ष वेधून घेतात. विशेष म्हणजे चिमणी एवढ्या आकाराचा आणि पंख भराभर हलवून उडणाऱ्या या पक्ष्यांना भांडीक नावाने देखील ओळखले जाते.

विशेष म्हणजे लांब व रुंद शेपूट वरवर दुभंगलेली, काळसर तपकीरी मुकुट, कंठ व छातीवर आर्या असणारे हे छोटे पक्षी सातत्याने चिवचिवाट करून लोकांचे लक्ष वेधून घेत आहेत. ऐरव्ही खोप्या मध्ये राहणाऱ्या चिमण्यांनी देखील काड्याकुड्याच्या खोप्या ऐवजी सध्या वाळुंच्या कणापासून कायमस्वरुपी घरांचा पर्याय शोधला आहे की काय असा जणू भास ही देवकिन्हई किंवा भांडीक पक्ष्यांची घरटी पाहून झाला नाही तर नवलच म्हणावे लागेल.





निसर्ग आणि माणूस यांचे नाते किती दृढ व अतुट असते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे येथील सुप्रसिद्ध विष्णुपद मंदिर. या विष्णूपद मंदिरात मार्गशीर्ष महिन्यात मोठी गर्दी होत असते. भाविक दर्शन घेत असताना या मंदिरात छताच्या बाजूस असलेली देवकिन्हई पक्ष्यांची घरटी लक्ष वेधून घेत आहेत. मागील गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून देवकिन्हई या पक्ष्याची घरटी इथे आहेत. अगदी हाताला येईल एवढ्या अंतरावर आहेत पण तरीही इथे येणारे भाविक या घरट्याचे नुकसान करीत नाहीत. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने देखील देवकिन्हई पक्ष्यांच्या घरट्याचे रक्षण केले असल्याने आता मंदिराच्या बाहेरील बाजूस सुध्दा यांनी आपली वस्ती विस्तारली असून या पक्ष्यांची संख्या मोठी वाढली असल्याचे येथील पक्षीमित्र आवर्जुन सांगतात. देवकिन्हई पैक्षांच्या घरट्यांचे वैशिष्ट्य म्हणजे लाळ व मातीचे गोळे एकत्र करून चिकटवून अत्यंत सुबक अशा गारुड्याच्या पुंगीसारखी त्यांची घरटी बनविलेली असतात.

**महत्वाचे मुद्दे -** श्री विष्णुपदावरील भांडीक किंवा देवकिन्हई पक्ष्यांची घरटी ठरताहेत लक्षवेधक. अत्यंत सुबक गारुड्याच्या पुंगीसारखी घरटी. पक्ष्यांच्या चिवचिवाटामुळे परिसरात रम्यता. घरट्यामधून मिळते जिद्द आणि एकीचे दर्शन. हे पक्षी जम ावानेच उडत असतात. भाविक या घरट्याचे नुकसान करीत नाहीत. या पक्ष्यांची जिद्द वाखाणण्याजोगी.

### देवकिन्हई पक्ष्यांची जिद्द वाखणण्याजोगी

देवकिन्हई पक्ष्यांची जिद्द वाखाणण्याजोगी असते. मनुष्य थोड्या अपयशाने लगेच खचून जातो, पण या पक्ष्यांचे तसे नाही, नदीला पूर आला की मंदिर पाण्यात जाते, पुराच्या पाण्यात घरटी वाहून जातात, पण हे पक्षी हिंमत हरीत नाहीत. पुन्हा नव्या जोमाने पूर ओसरला की देवकिन्हई पक्षी आपली घरटी बनवितात.

### फेब्रुवारी ते सप्टेंबर हा वीणीचा हंगाम

साधारणपणे किल्ले, पडक्या मशिदी, ओसाड हवेल्या व देवळे अशा ठिकाणी यांचे वास्तव्य असते. उडणारे किडे हे यांचे भक्ष्य होय. हवेत उडत असतानाच ते आपले भक्ष्य पकडतात. जवळजवळ सगळा दिवस ते अवकाश विहारामध्ये घालवितात. ह्यांचा विणीचा हंगाम फेब्रुवारीपासून सप्टेंबरपर्यंत असतो.